७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक
शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १२० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# पोलीस क्रीडा स्पर्धा महाराष्ट्राचे ‘महा-ऑलिंपिक’

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे : ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ चा शुभारंभ

**मुंबई (दै. संध्या)**

नेहमी कायदा-सुव्यवस्थेसाठी रस्त्यावर खंबीरपणे उभे राहणाऱ्या पोलिसांना आज क्रीडांगणावर खेळाडूंच्या पोशाखात पाहून अभिमान वाटतो. महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा या खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या ‘महा ऑलिंपिक’ असून, या स्पर्धेतून पोलीस दलाची ताकद, शिस्त आणि क्रीडा कौशल्य जगासमोर यावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत कलिना येथील सशस्त्र पोलीस मुख्यालयाच्या क्रीडांगणावर ३६ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा-२०२६ चा शुभारंभ झाला.



राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या पोलीस अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभात स्पर्धामध्ये सहभागी पथकांनी शिस्तबद्ध संचलन केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विलेपार्ले येथील पार्लेकर महिला ढोल ताशा पथकाने विशेष सादरीकरण केले. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, गृह राज्यमंत्री योगेश कदम, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे ‘महा ऑलिंपिक’ असून, पोलिसांनी आपल्या क्रीडा कौशल्याच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस हे सर्वोत्कृष्ट असल्याचे जगाला दाखवून द्यावे. नेहमी खाकी वर्दीत रस्त्यावर, मोर्चे-आंदोलन, सण-उत्सवात कर्तव्य बजावणारे पोलीस आज खेळाडूंच्या पोशाखात मैदानावर उतरलेले पाहून आनंद होत आहे. खेळात हार-जीत होणे हे स्वाभाविक आहे.

सतत प्रयत्नशील राहणे महत्त्वाचे आहे. या स्पर्धांमुळे पोलीस दलातील संघभावना, खेळाडू वृत्ती आणि स्पर्धात्मक वृत्ती अधिक बळकट होईल, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र पोलीस दलातील खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर, विशेषत: पोलीस क्रीडा स्पर्धांत सुवर्णपदकांसह अनेक पदके मिळवत राज्याची मान उंचावल्याबद्दल उपमुख्यमंत्र्यांनी कौतुक केले. पुढील काळात राष्ट्रीय पातळीबरोबरच ऑलिंपिक स्पर्धांमध्येही राज्यातील पोलिस खेळाडूंना संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

पोलिसांच्या सेवाभावाचा गौरव करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कायदा-सुव्यवस्था राखताना पोलिसांवर सर्वाधिक ताण येतो, तरीही ते ऊन-वारा-पावसात, सण-उत्सवात, मोर्चा-आंदोलनात सतत रस्त्यावर असतात. अशा तणावपूर्ण कामाच्या पार्श्वभूमीवर या क्रीडा स्पर्धा पोलिसांचा मानसिक ताण कमी करतात, थकवा दूर करतात आणि विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी यांच्यातील मैत्री व सामूहिकता वृद्धिंगत करतात. मुंबईला देशाचे ग्रोथ इंजिन संबोधत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सुदृढ कायदा-सुव्यवस्थेमुळेच गुंतवणूक, व्यापार, उद्योग आणि शिक्षण-कला-संस्कृतीचा सर्वांगीण विकास शक्य होतो. राज्यातील गुन्हे उकलण्याचे प्रमाण वाढले असून, सुमारे ९० टक्के प्रकरणांमध्ये ६० दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल केले जात असल्याने पोलिसांवरचा जनतेचा विश्वास वाढत आहे.

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची २६ एप्रिल रोजी निवडणूक




**मुंबई (दै. संध्या)**

वैद्यकीय परिषदेवरील नऊ सदस्यांच्या निवडीकरिता २६ एप्रिल, २०२६ रोजी निवडणुकांचे आयोजन राज्यात करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी ६० उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून नोंदणीकृत व नोंदणीचे नूतनीकरण केलेले सुमारे १,४०,००० मतदार मतदानाचा हक्क बजावू शकतील. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार वैद्यकीय परिषदेतील नऊ सदस्यांची निवड ही राज्यातील नोंदणीकृत व नोंदणीचे नुतनीकरण केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांमार्फत करण्यात येते.

या निवडणुकीकरीता राज्यातील जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी, जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणांतर्गत निवडणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हानिहाय निवडणूक केंद्र व मतदारयादी यांचा तपशील महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या वेबसाइटवर (www.maharashtramedicalcouncil.in) उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. २६ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीकरीता मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० अशी आहे. मतमोजणीचे नियोजन २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता पासून मतमोजणी संपेपर्यंत हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, परळ येथे करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने प्रसिद्धपत्रकाद्वारे कळविले आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## ‘सपोर्ट पर्सन’ साठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई (दै. संध्या) : बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) अंतर्गत बाल पीडितांना न्यायप्रक्रियेदरम्यान सहाय्य व संरक्षण देण्यासाठी ‘सपोर्ट पर्सन’ नियुक्तीसाठी मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असल्याची माहिती मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. इच्छुक उमेदवारांनी 15 दिवसांच्या आत आपले अर्ज ‘जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, 117, बी.डी.डी. चाळ, पहिला मजला, वरळी, मुंबई- 400018 या पत्त्यावर सादर करावेत. तसेच अर्ज ई-मेलद्वारे depumumbai12@gmail.com या ईमेलवर पाठविता येतील. अर्जांची छाननी झाल्यानंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख कळविण्यात येणार आहे. सपोर्ट पर्सनसाठी सामाजिक कार्य, समाजशास्त्र, मानसशास्त्र किंवा बालविकास विषयात पदव्युत्तर पदवी किंवा पदवीधर असून किमान तीन वर्षांचा बाल शिक्षण, विकास किंवा संरक्षण क्षेत्रातील अनुभव असणे आवश्यक आहे. संगणक ज्ञान (एमएससीआयटी) किंवा समकक्ष प्रमाणपत्र अपेक्षित आहे. तसेच बालहक्क किंवा बालसंरक्षण क्षेत्रात कार्यरत संस्थांनाही अर्ज करता येणार असून बालगृह किंवा शेल्टर होममधील संबंधित अधिकारीही पात्र ठरू शकतात.

## मराठी भाषा शिकवण्यासाठी साहित्यिकांचा पुढाकार : प्रताप सरनाईक

**मुंबई (दै. संध्या)**

रिक्षा, टॅक्सी तसेच ई-बाईक टॅक्सी सेवांमधील व्यावसायिक वाहनचालकांना प्रवाशांशी मराठीतून संवाद साधता यावा, यासाठी मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषदेशी निगडीत साहित्यिकांनी चालकांना व्यावहारिक मराठी शिकवण्यासाठी पुढाकार घेण्याची तयारी दर्शविली आहे. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रम लवकरच तयार करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात यासंदर्भात बैठक झाली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, मराठी भाषा विभागाचे उपसचिव नामदेव भोसले, राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ.शामकांत देवरे तसेच तज्ज्ञ, साहित्यिक उपस्थित होते.

वाहनचालकांना खेळीमेळीच्या वातावरणात व्यावहारिक मराठी शिकविण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषद आपल्या ७२ शाखांमधून शिकवणी वर्ग सुरू करण्याची तयारी दर्शवित आहे. तसेच, मुंबई मराठी साहित्य संघाने आपल्या स्वयंसेवी शिक्षकांच्या माध्यमातून ऑनलाईन मराठी भाषा प्रशिक्षण देण्याची तयारी दर्शविली आहे. या प्रशिक्षणासाठी चालकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. ‘महाराष्ट्र दिना’चे औचित्य साधत संपूर्ण राज्यभर रिक्षा व टॅक्सी चालकांच्या परवान्यांची तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान इतर नियमांसोबतच चालकांना मराठी भाषेचे व्यवहारज्ञान आहे की नाही, याचीही पडताळणी केली जाणार आहे. वाहनचालकांमध्ये मराठी भाषेबद्दल आत्मीयता निर्माण होण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.




# जागतिक दर्जाच्या गेमिंग क्षेत्रात महाराष्ट्र मोठी भरारी घेणार

### मंत्री मंगलप्रभात लोढा : कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने भारतात प्रथमच डिजिटल गेम डेव्हलपर स्पर्धा

**मुंबई (दै. संध्या)**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्या वतीने भारतात प्रथमच आयोजित करण्यात आलेली डिजिटल गेम डेव्हलपर स्पर्धा युवकांसाठी नवी संधी निर्माण करणारी ठरेल, असा विश्वास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला. या अभिनव उपक्रमातून महाराष्ट्र जागतिक दर्जाच्या गेमिंग क्षेत्रात मोठी भरारी घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

चर्चगेट येथील इंडियन मर्चंट्स चेंबर सभागृहात राज्य नाविन्यता सोसायटी, युनिटी आणि गुगल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गेम डेव्हलपर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप व पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील, तमिळनाडू कौशल्य विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व्ही. विष्णू, गुगल प्लेचे व्यवस्थापकीय संचालक आदित्य स्वामी हे मान्यवर उपस्थित होते.




मंत्री लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या ‘विकसित भारत २०४७’ या संकल्पनेनुसार सर्जनशीलता आणि नावीन्यतेच्या बळावर भारत जागतिक स्तरावर अग्रस्थानी पोहोचू शकतो. कौशल्य विकासाच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्याच धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य गेमिंग आणि डिजिटल क्षेत्रात आघाडीचे केंद्र बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे. गेमिंग क्षेत्र हे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे उदयोन्मुख क्षेत्र असून योग्य कौशल्य आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात, असे मंत्री लोढा यांनी नमूद केले. युवकांनी या संधींचा लाभ घेऊन नाविन्यपूर्ण क्षेत्रात प्रगती साधावी, असे आवाहनही त्यांनी केले.

अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा म्हणाल्या की, उद्योगस्नेही आणि मानकीकृत प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवकांना जागतिक दर्जाच्या कौशल्यांची जोड मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे रोजगारक्षमता वाढण्यासोबतच अर्थव्यवस्थेलाही चालना मिळत आहे.

राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, नाविन्यतेवर आधारित परिसंस्था उभारण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांना विशेष महत्त्व आहे. गेल्या सहा महिन्यांपासून राबविण्यात आलेल्या या प्रशिक्षण कार्यक्रमात सुमारे ५,००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून त्यापैकी ५०० विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय गेम प्रकल्प सादर केले. या सर्वांचा सन्मान करण्यात आल्याचा त्यांनी आनंद व्यक्त केला.

तामिळनाडूचे कौशल्य विकास विभागाचे व्यवस्थापकीय संचालक व्ही. विष्णू म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या मानकांनुसार कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळते आणि नवोन्मेषी विचारसरणी विकसित होते. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र आणि तमिळनाडू येथील सहभागी विद्यार्थ्यांना युनिटीचे जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. गेम डिझाइन, डेव्हलपमेंट आणि मोनेटायझेशन या महत्त्वाच्या घटकांवर आधारित प्रशिक्षण या उपक्रमात देण्यात आले.कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या गेम्सचे सादरीकरण केले, ज्यातून प्रशिक्षणाच्या व्यावहारिक परिणामांचे दर्शन घडले.

### नामशेष होत असलेल्या कलांचे जतन करण्यासाठी विद्यापीठांना पुढाकार घेण्याची सूचना

# कृत्रिम बुद्धिमत्तेला संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन व्हावे

**राज्यपाल जिष्णु देव वर्मा**

**मुंबई (दै. संध्या)**

आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता व मशीन लर्निंग विविध क्षेत्रात मोठी भूमिका बजावणार आहे. त्याचे लाभ जसे अनेक आहेत तसेच त्यातून अनेक समस्या देखील निर्माण होऊ शकतात. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेला अधिक संवेदनशील बनवण्याबाबत चिंतन झाले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेची व्याप्ती वाढवून समाजाच्या शेवटच्या घटकातील लोकांना घेऊन समावेशी विकास झाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

नाविन्यपूर्ण कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी मुंबई येथील ॲटलास स्किलटेक युनिव्हर्सिटीने सुरु केलेल्या ‘सेंटर फॉर इनोव्हेशन‘चे उदघाटन राज्यपालांच्या हस्ते संस्थेच्या बीकेसी येथील शैक्षणिक संकुलात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी ओ. पी. जिंदल ग्लोबल युनिव्हर्सिटीने ‘सिरील श्रॉफ सेन्टर ऑफ एआय, लॉ अँड रेग्युलेशन‘ यांच्या सहकार्याने आयोजित ‘गव्हर्निंग एआय : कायदा, तंत्रज्ञान व समाज‘ या विषयावरील चर्चासत्राचे देखील उद्घाटन राज्यपालांनी केले. तंत्रज्ञान उपलब्ध असणे, परंतु ठोस उद्दिष्ट समोर नसणे; किंवा विज्ञान उपलब्ध असणे, परंतु त्याला मानवी मूल्यांची जोड नसणे धोक्याचे असते, असे सांगून कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करताना दया, अनुकंपा व सहानुभूतीचा त्यामध्ये अंतर्भाव असला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले. या दृष्टीने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये दुर्बल घटकांबद्दल अनुकंपा सहानुभूती बाणवली पाहिजे, असे आवाहन राज्यपालांनी केले. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी ‘जय जवान’ या घोषणेला ‘जय किसान’ची घोषणेची जोड दिली होती. त्यानंतर पंतप्रधान वाजपेयी यांनी आपल्या काळात त्याला ‘जय विज्ञान‘ची जोड दिली व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या घोषणेला ‘जय अनुसंधान’ची जोड दिली असे सांगून सध्याचे युग हे विज्ञान व नवोन्मेषाचे असल्याचे राज्यपालांनी सांगितले.



‘विकसित भारत‘ संज्ञेचा अर्थ आर्थिक दृष्ट्या संपन्न भारत इतका मर्यादित नाही असे सांगून ‘विकसित भारत‘ म्हणजे ‘सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे संतु निरामय‘ हा आहे व त्याकरिता प्रत्येक व्यक्तीचा विकास होणे आवश्यक आहे असे राज्यपालांनी सांगितले.

आधुनिकीकरण तसेच मोठ्या प्रमाणावर यंत्रनिर्मित वस्तूंचा वापर वाढल्यामुळे आज जगभरातील हजारो पारंपरिक कला प्रकार आणि हस्तकला नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. एक कला जरी नामशेष झाली तरी आपण आपली सांस्कृतिक ओळख गमावतो. त्यामुळे नामशेष होत असलेल्या कलांचे जतन व संवर्धन झाले पाहिजे व त्यासाठी विद्यापीठांनी पुढाकार घेतला पाहिजे असे राज्यपालांनी सांगितले.

एखादी दुर्मिळ कला वाचवणे म्हणजे तिला संग्रहालयात बंदिस्त करणे असे नसून तिला नवसंजीवनी देणे होय असे राज्यपालांनी सांगितले. या कार्यात ॲटलास कौशल्य विद्यापीठाने देखील पुढाकार घ्यावा असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठातर्फे प्रकाशित एआय गव्हर्नन्स अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. ॲटलास स्किलटेक विद्यापीठाच्या संस्थापिका डॉ. इंदू शहानी यांनी प्रास्ताविक केले तर ओ.पी. जिंदल ग्लोबल विद्यापीठाचे कुलगुरु सी राज कुमार यांनी ‘गव्हर्निंग एआय’ या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राची भूमिका विशद केली. सुरुवातीला राज्यपालांनी विद्यापीठाच्या नाविन्यता केंद्राला भेट दिली व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांचेकडून नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोगांची माहिती घेतली.

## प्रशासन आणि उद्योगांत ‘एआय’ मुळे मोठे बदल : मुख्य सचिव राजेश अग्रवाल

**मुंबई (दै. संध्या)**

भविष्यात ‘एआय’ केवळ माहिती प्रक्रिया करण्यापुरते मर्यादित न राहता प्रशासन, उद्योग आणि दैनंदिन जीवनात मोठा बदल घडवेल असे प्रतिपादन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले.

भारतीय लोकप्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखा आणि सामान्य प्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथील परिषद सभागृहात ‘स्व. श्री. बी. जी. देशमुख स्मृती व्याख्यान’ झाले. व्याख्यानाचा विषय “कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगातील नागरिक सेवा” असा होता.

यावेळी भारतीय लोकप्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे मानद अध्यक्ष माजी मुख्य सचिव आणि सार्वजनिक सेवा हक्क आयोगाचे माजी राज्य मुख्य आयुक्त स्वाधीन क्षत्रिय, भारतीय लोकप्रशासन संस्था, नवी दिल्लीचे महासंचालक डॉ. सुरेंद्रकुमार बागडे, भारतीय लोकप्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखेचे मानद कोषाध्यक्ष विकास विनायक देवधर, मुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी यांच्यासह संस्थेचे सदस्य उपस्थित होते.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल म्हणाले, ऊर्जा, डेटा सेंटर, क्लाउड आणि एआय या घटकांवर भर देत शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ करण्यासाठी एआय महत्त्वाची भूमिका बजावेल. एआय माध्यमातून नागरिकांच्या दैनंदिन सेवांचा अनुभव पूर्णपणे बदलू शकतो. परवाने, प्रमाणपत्रे किंवा इतर शासकीय सेवा यांसाठी अर्ज, तपासणी आणि मंजुरी प्रक्रिया मोठ्या प्रमाणात स्वयंचलित होऊ शकते. तसेच भविष्यात रोबोटिक्स आणि एआयच्या संगमामुळे उद्योग आणि रोजगार क्षेत्रातही मोठे परिवर्तन होणार असून, प्रशासनाने या बदलांसाठी सज्ज राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



■ ‘कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील नागरिक सेवा’ विषयावर मंत्रालयात स्व. बी. जी. देशमुख स्मृती व्याख्यान

## संपादकीय

# इराणची 'लेडी डॉन', जिनं अमेरिकेला चकवलं!

अमेरिकेच्या लॉस एंजेलिस इंटरनॅशनल एअरपोर्टवर शनिवारी रात्री एका महिलेला शस्त्रांसह अटक करण्यात आली आणि एकच खळबळ उडाली. केवळ अमेरिका आणि इराणच नव्हे, तर संपूर्ण जगभरात सध्या तिची चर्चा सुरू आहे. कोण आहे ही महिला? आणि तिनं असं केलं तरी काय, ज्यामुळे जगभरात सध्या तिचा बोलबाला आहे? या महिलेचं नाव आहे शमीम माफी. पण, त्याहीपेक्षा 'लेडी डॉन' म्हणून ती अधिक प्रसिद्ध आहे. अमेरिकेच्या डोळ्यांत धूळ फेकत गेली अनेक वर्षे तिचे कारनामे अखंड सुरू होते. इराण सरकारसाठी शस्त्रास्त्रांची तस्करी करत असल्याचा तिच्यावर आरोप आहे. इराणमध्ये बनवलेले बॉम्ब, ड्रोन, बॉम्ब फ्यूज आणि लाखो राउंड दारूगोळ्याशी संबंधित व्यवहारांमध्ये मुख्य दलाल म्हणून काम करीत असल्याचा तिच्यावर संशय आहे. अतिशय पद्धतशीर आणि थंड डोक्यानं ती काम करायची. त्यातूनच तिनं एक मोठ्ठं नेटवर्क उभारलं होतं आणि त्या माध्यमातून ती शस्त्रास्त्रांची तस्करी करायची. ४४ वर्षांच्या शमीमनं इराणी बनावटीचे ड्रोन, बॉम्ब आणि लाखो टन दारूगोळा सुदानला विकल्याचा आरोप आहे.अमेरिकन अटॉर्नी बिल एसेली यांनी X वर पोस्ट केलेल्या निवेदनात म्हटलं आहे, वुडलँड हिल्स येथील ४४ वर्षांच्या शमीमनं शस्त्रास्त्रांच्या तस्करीसाठी अनेक कुमार्गांचा वापर केला आणि त्यातून प्रचंड पैसा कमावला. शमीमची कहाणीही अतिशय रोमहर्षक आहे. शमीम मूळची इराणी नागरिक असून, २०१३ मध्ये तिनं आपला देश सोडला आणि २०१६ मध्ये अमेरिकेची कायदेशीर कायमस्वरूपी रहिवासी बनली. त्यानंतर हळूहळू तिनं आपलं जाळं पसरायला सुरुवात केली. राजकारणी आणि अधिकाऱ्यांशी संपर्क वाढवला आणि त्यानंतर शस्त्रास्त्रांच्या तस्करीच्या मार्गांतून 'लेडी डॉन' अशी तिची प्रतिमा तयार झाली. अमेरिकन अधिकाऱ्यांचा दावा आहे की त्यांच्याकडे असलेल्या फोन रेकॉर्डनुसार डिसेंबर २०२२ ते जून २०२५ दरम्यान शमीम इराणच्या गुप्तचर आणि सुरक्षा मंत्रालयाच्या थेट संपर्कात होती. सरकारी वकिलांचं म्हणणं आहे, अशा व्यवहारांसाठी तिच्याकडे आवश्यक कायदेशीर परवानगी नव्हती.

एकीकडे तिच्यावर हे आरोप होत होते; पण, दुसरीकडे मात्र तिची सार्वजनिक प्रतिमा वेगळीच दिसत होती. तिथे ती बरीच लोकप्रिय होती. सोशल मीडियावर आपली आलिशान जीवनशैली दाखवणारे फोटो ती वारंवार शेअर करीत असे.



आपले परदेशदौरे आणि महागड्या मर्सिडीज-बेन्झ रोडस्टरसह काढलेले फोटो यामुळेही सोशल मीडियावर तिची चांगलीच चर्चा होती. शस्त्रास्त्र तस्करीच्या गुन्ह्यात न्यायालयात शमीम दोषी ठरल्यास तिला फेडरल तुरुंगात जास्तीतजास्त २० वर्षांची शिक्षा होऊ शकते. तपासकर्त्यांचा आरोप आहे की शमीमनं हे व्यवहार सुलभ करण्यासाठी ओमानमध्ये नोंदणीकृत 'एटलस इंटरनॅशनल बिझनेस' या कंपनीचा वापर केला; यापैकी काही व्यवहार कथितपणे २०२५ पर्यंत सुरू होते. दरम्यान, न्यायालयीन कागदपत्रांमध्ये तिचे काही व्यवहारही नमूद करण्यात आले आहेत. त्यात इराणी संरक्षण मंत्रालय आणि सशस्त्र दल लॉजिस्टिक्सकडून तयार करण्यात आलेल्या Mohajer-6 सशस्त्र ड्रोनसाठी ७० दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचा करारही समाविष्ट आहे. हे ड्रोन आणि त्यांच्यासोबत हजारो बॉम्ब फ्यूज कथितपणे सुदानच्या संरक्षण मंत्रालयाला पुरविण्यात आले होते.

## संस्कृत सुभाषित

अशनाया वै पाप्यमतिः

अर्थ – भुकेमुळेच माणसाच्या मनात पाप बुद्धी निर्माण होते.

## गुरु वचन

### कुशल मार्गदर्शन

एका प्रयोगशाळेत काही विद्यार्थी प्रयोग करत होते. यावेळी दोन विद्यार्थ्यांकडून मोठी चूक झाली. त्यांना वाटले की, आता त्यांना कठोर शिक्षा मिळेल. प्रयोगशाळा त्यावेळी प्रसिद्ध वैज्ञानिकाने काही दिवसांपूर्वीच सुरु केली होती. दोन्ही विद्यार्थी घाबरत-घाबरत त्यांच्याजवळ गेले. वैज्ञानिकाने त्यांना घाबरलेले पाहून विचारले, काय झाले? यावर एक विद्यार्थी घाबरत-घाबरत म्हणाला, सर इलेक्ट्रिक मिटर खराब झाले आहे. यामुळे त्याच्यात खूप जास्त करंट पसरला आहे. हे ऐकून वैज्ञानिक सुन्न झाला. नंतर त्याने स्वत:ला सावरले आणि म्हणाला, अरे फक्त एवढ्या छोट्या गोष्टीसाठी तुम्ही दोघे एवढे परेशान आहात. विद्यार्थी जेव्हा प्रयोग करतात तेव्हा अशा गोष्टी घडतच असतात. जर विद्यार्थ्यांनी चूका केल्या नाहीत तर ते शिकतील कसे? परंतु भविष्यात प्रयोग करताना मात्र अवश्य सावधानी बाळगायला हवी. ज्यामुळे अशा प्रसंगापासून वाचता येईल. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकाचे म्हणणे ऐकूल्यानंतर वैज्ञानिकाप्रती त्यांच्या मनात आदर निर्माण झाला. तथापि, जी चूक या दोन्ही विद्यार्थ्यांकडून झाली होती. त्यामुळे एका खूप महागडे आणि महत्त्वाचे यंत्र पूर्णपणे जळाले होते आणि ते यंत्र सध्या बाजारात उपलब्ध नव्हते. एवढेच नव्हे तर ते यंत्र जळाल्यामुळे अनेक महत्त्वपूर्ण प्रयोगही थांबले होते. परंतु वैज्ञानिक या नुकसानावर न चिडले न त्यांनी दोन्ही विद्यार्थ्यांवर राग व्यक्त केला. तर दोन्ही विद्यार्थ्यांना भयमुक्त केले. त्यानंतर ज्यांनीही हा प्रसंग ऐकला. त्यांनी वैज्ञानिकाची स्तुती केली.

## उपदेशकथा

### निर्भय

भावाची प्रकृती बिघडल्याचा निरोप गणपतला मिळाला तेव्हा तिन्हीसांजा उलटून गेल्या होत्या. त्या काळी विजेचे दिवे नव्हते. गणपत कंदिल घेऊन गावी निघाला. गावाची वाट जंगलातून जाणारी होती. सभोवताली किर्रर काळोख पसरला होता. त्यामुळे वातावरण जास्तच भीषण झाले होते. रस्ता निर्मनुष्य. इतक्यात एक झाडाची फांदी पडली. गणपत घाबरला आणि एका झाडावर आदळला. त्यामुळे कंदिल पडला आणि फुटला. घाबरत गणपत उठला. त्याला चालण्याची चाहूल लागली. गणपतला वाटले भूतच आहे. त्यामुळे तो किंचाळला. किंचाळलेला आवाज ऐकून चालणारा माणूस पुढे आला पण तो पांगळा होता. त्याच्या कुबड्यांचा तो आवाज होता, ते काही भूत नव्हते. त्या पांगळ्याने गणपतला विचारले, एवढ्या अंधारात कुठे निघालात? गणपतला हा आवाज एका माणसाचा आहे हे कळले आणि तो एकदम शांत झाला. त्याची भीतीच पळाली. तो निर्भय झाला आणि त्याने पांगळ्याचा हात हातात घेतला आणि चालू लागला. परमेश्वराच्या रूपाने तो पांगळा गणपतला भेटला. कारण त्याचा पांगळेपणा गणपतला जाणवलाच नाही. उलट त्याचा भरभक्कम अंधारच वाटला. म्हणून परमेश्वर सतत सांगाती असतो ही भावना मनात रुजवली की कायम त्याची साथ मिळेल आणि आपण निर्भय बनू.

कथा उपदेश : निर्भय बनवून परिस्थीचा सामना करा.

## पंचांग

२५ एप्रिल २०२६
शनिवार
विक्रम संवत्- २०८२
वैशाख शके
संवत्- १९४८
संवत्सर – पराभवनाम
अयन- उत्तरायणारंभ
मास- वैशाख
ऋतु- हेमंत
शुक्ल पक्ष
तिथि:नवमी १८:२८:१९
नक्षत्र:ओषा २०:०४:३३
योग:गण्ड २३:४२:४९
करण:बालव ०६:५०:५८
करण:कौलव १८:२८:१९
करण:तैतिल
३०:१३:५०+
सूर्य:मेष
चन्द्र:सिंह२०:०४:३३
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – जिल्काद
तारीख – ७
विशेष
सीता नवमी
पुरुषोत्तम महाराज
पुण्यतिथी – काटोल
रामनाथस्वामी यात्रा –
वाढोणा (अमरावती)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | | 3 | | | | |
| 9 | 7 | | 2 | 8 | | | | 1 |
| 1 | 3 | | | 5 | | 4 | | |
| 3 | | | 8 | 4 | | 7 | | |
| 7 | 4 | 1 | | | | 8 | 3 | 5 |
| | | 2 | | 7 | 1 | | | 6 |
| | | 4 | | 6 | | | 5 | 8 |
| 8 | | | | 2 | 9 | | 7 | 4 |
| | | | | 1 | | | 9 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १२८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 5 | 6 | 8 | 3 | 7 | 4 | 9 | 1 |
| 1 | 3 | 4 | 6 | 9 | 2 | 8 | 7 | 5 |
| 8 | 9 | 7 | 4 | 1 | 5 | 3 | 2 | 6 |
| 4 | 2 | 1 | 7 | 5 | 3 | 9 | 6 | 8 |
| 5 | 6 | 3 | 9 | 8 | 1 | 2 | 4 | 7 |
| 7 | 8 | 9 | 2 | 6 | 4 | 5 | 1 | 3 |
| 9 | 7 | 5 | 3 | 2 | 6 | 1 | 8 | 4 |
| 6 | 1 | 8 | 5 | 4 | 9 | 7 | 3 | 2 |
| 3 | 4 | 2 | 1 | 7 | 8 | 6 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६०७ – ८० वर्षांचे युद्ध – नेदरलँडने जिब्राल्टरजवळ स्पेनचे आरमार बुडवले.
- १७९२ – क्लॉड जोसेफ रूगे दि लिलने फ्रेंच राष्ट्रगीत ला मार्सेलची रचना केली.
- १८२९ – चार्ल्स फ्रीमॅन्टल पश्चिम ऑस्ट्रेलियाला पोचला.
- १८४६ – मेक्सिको व टेक्सासच्या प्रजासत्ताक मध्ये सीमावाद चिघळला. चकमकी सुरू.
- १८५९ – सुएझ कालव्याची पायाभरणी.
- १८६२ – अमेरिकन गृहयुद्ध – उत्तरेने न्यू ऑर्लिअन्स जिंकले.

### राष्ट्रीय

- २००६ – मणिपुरमध्ये सुरक्षा सैनिकांच्या चकमकीत ४ अतिरेकी ठार झाले.
- २००७ – पुंछमध्ये मॅटेडोर दरीत कोसळून १५ जण ठार झाले.

### जन्म

- ००३२ – मार्कस साल्व्हियस ओथो, रोमन सम्राटांचा जन्म.
- १२१४ – लुई नववा, फ्रांसचा राजा यांचा जन्म.
- १२२८ – कॉन्राड दुसरा, जर्मनीचा राजा यांचा जन्म.
- १२८४ – एडवर्ड दुसरा, इंग्लंडचा राजा यांचा जन्म.
- १५४५ – यी सुन शिन, कोरियन दर्यासारंग यांचा जन्म.
- १५९९ – ऑलिव्हर क्रॉम वेल, ब्रिटीश राजकारणी, अघोषित राजा यांचा जन्म.
- १८७४ – गुग्लियेमो मार्कोनी, इटलीचा संशोधक यांचा जन्म.

### निधन

- ११८५ – अंतोकु, जपानी सम्राटाचे निधन.
- १२९५ – सांचो चौथा, कॅस्टिलचा राजा यांचे निधन.
- १६०५ – नरेस्वान, सयामचा राजा यांचे निधन.
- १६४४ – चाँगझेंग, चीनी सम्राटाचे निधन.

## : SMS :

Manzil ki taraf badhte chalo. Jo Dil kahe usi rah ko chuno, piche walo ko age na jaane do aur jo aage hai unse aage niklo. Tabhi 1 acche Truck Driver banoge....

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३६.९ | २६.९ |
| अहमदनगर | ३६.७ | २५.९ |
| अकोला | ४०.९ | २८.५ |
| अमरावती | ३९.४ | २८.४ |
| बीड | ४२.३ | ३१.२ |
| भंडारा | ४०.२ | २९.२ |
| बुलढाणा | ४० | २२.६ |
| चंद्रपूर | ४२.३ | ३२.४ |
| चेन्नई | ४३.९ | ३३.४ |
| नवी दिल्ली | ४०.२ | २६ |
| धुळे | ३९ | २६.१ |
| गोंदिया | ३९.१ | २८.७ |
| जळगाव | ४१ | २७.६ |
| कोल्हापूर | ३७.७ | २४.४ |
| लातूर | ३७.४ | २५.४ |
| मुंबई | ४१.९ | ३१.५ |
| नागपूर | ३९.८ | २९.५ |
| नांदेड | ३९.५ | २८.७ |
| नंदूरबार | ३७.८ | २६.३ |
| नाशिक | ३६.९ | २३.५ |
| पुणे | ३६.१ | २४.५ |
| पंढरपूर | ३९.४ | २६.५ |
| सातारा | ३८.२ | २३.४ |
| सांगली | ३८.८ | २५.७ |
| सोलापूर | ३९.८ | २६.८ |
| वर्धा | ४०.३ | ३० |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व जीवनात सुख समृध्दीची वाढ होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे.

**तुळ :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: पश्चिम व्यापारात चढ उतार येतील. कौटुंबिक वातावरण तणावग्रस्त राहील.

**वृषभ :** शुभ रंग : पांढरा,शुभ दिशा:उत्तर राजकीय कामात यश मिळण्याचे योग आहेत. चांगल्या कामासाठी पैसा खर्च होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम योजनेमध्ये यश मिळणार आहे. पराक्रमात वाढ होईल. वेळेचा सदुपयोग करा.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व सामाजिक कामात सक्रीय राहताल. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील.

**धनु :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा: दक्षिण चांगल्या व उत्साही मित्राचा सहवास फायदेशीर राहील. व्यवसायात उन्नतीचे योग आहे. आकर्षक प्रस्ताव मिळेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: उत्तर प्रवास कष्टदायक राहील त्यामुळे तो टाळावा. प्रत्येक कामात सावधानी बाळगावी.

**मकर :** शुभ रंग:भूरकट, शुभ दिशा:दक्षिण आधिकारी लोक आपल्याला सहकार्य करतील. व्यापार वाढण्यासाठी प्रयत्न करावे.


**सिंह :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा :दक्षिण आपल्या प्रयत्नामुळे मोठी समस्या दूर होईल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे.

**कुंभ :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण जीवनसाथीशी संबंध दृढ होतील. परोपकारामुळे संतोष वाटेल. व्यापार रोजगार चांगला चालेल.

**कन्या :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा:पूर्व आपल्या मनमिळावू स्वभावामुळे आपल्या कुटुंबाचा समाजात आदर निर्माण होईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम चांगल्या दिवसाचा पुरेपूर फायदा घ्या. महत्वाची कामे वेळेवर करू शकाल. भौतिक सुविधा प्राप्त होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२९



### आडवे शब्द

१. गावभर कुचाळक्या करत फिरणारी स्त्री
५. मिळकत
८. 'च्या' बरोबर
९. श्रीकृष्ण
११. बभ्रा
१२. बोलणे
१४. पुष्पराग
१५. नको इतकी जास्त उपलब्धता
१७. शेवट
१८. 'ती फुलराणी', 'तुझे आहे तुजपाशी'चे नाटककार
२२. किनारा
२३. नि:श्वास
२५. देव
२६. ध्वनी
२७. वर्षागणिक वयात होणारी
२८. सरावाने कुशल झालेला
३०. वधू
३२. क्रीडा
३३. आकाश
३४. गर्भगृह, देवळात देवाची जागा
३७. चमत्कार
३८. खरे, ऋत
४०. पद्धतशीर
४२. आयुष्य
४३. खोटा आरोप
४४. सबळ, ताकदवान
४५. इंद्र
४७. तडजोड न करणारा
४९. परीट
५०. उपवासाला चालणारे अरबी फळ
५२. नकारत्मक भावना
५३. पळून गेलेला
५५. शबरीने रामाला दिलेली फळे
५६. जागृतावस्था
५९. रोटीचे एक धान्य
६०. रेती
६२. दिवा
६४. समशेर
६७. अग्नी
६८. खड्डा
७०. रिता, रिकामा
७१. पराक्रमी पुरुष
७३. ज्योतिषातील एक रास
७४. त्रास
७५. चप्पल
७६. गायक
७७. वेळू, बांबू
७९. चक्र
८०. याचे बोलावणे सर्वांना नकोसे!
८२. यज्ञ
८३. छाती
८४. उलट
८५. मासेमारीचा हूक
८६. करंजी-मोदकाच्या पोटातील गोड भाग

### उभे शब्द

१. '... कालचा गोंधळ बरा होता'
२. चांगला, मोठा, अफाट
३. पाया (हिंदी)
४. मुस्लिमांची प्रार्थना
६. पश्चिम दिशा
७. धुळीचे वादळ
८. प्रश्नोत्तरांची जुगलबंदी
१०. कंठ
११. घसा
१२अ. प्रथा
१३. कुळ
१६. भांडणाची खुमखुमी
१९. हिंदीत उशीर
२०. शुभ्र
२१. लोणी
२३. पुत्र
२४. भयभीत
२८. पिंपळपानांचा आवाज
२९. देव
३१. मोकळीक
३४. थंडी
३५. कमळ
३६. लोकसंख्येची मोजणी
३९. नि:संशय
४१. न्यायदेवतेचे प्रतीकचिन्ह
४३. दर्पण
४४. जागरूक
४६. आप्त
४८. दोष ठेवणे
५०. वस्तू विकत घेण्याची क्रिया
५१. नोकरीतील सुटी
५४. दाणेदार
५७. अवस्था
५८. एक मंजुळ कांूफ्कवाद्य
५९. सर्वांशी प्रेमाने वागणारा
६१. घोटाळा, एक पालेभाजी
६३. लग्न
६५. झुंजार
६६. सूर्य
६७. सीता
६८. दृष्ट
६९. गावचा रहिवासी
७२. युद्धभूमी
७४. साद
७८. चेहरा
७९. धनुष्य
८१. नंतर
८२. मित्र

### जम्बो शब्दकोडे क्र. १२८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.पुन्हा पुन्हा ३.आयाराम गयाराम ८.वासा १०.तारा ११.मगर १२.अवाई १३.तबकडी १६.धवल १७.मनकवडा १८.नट १९.रकाना २१.खाशाबा २३.वार २५.क्षणभंगूर २९.हारजीत ३१.जमाना ३२.दास ३३.सपाट ३५.रूपवान ३८.वकार ४०.लगाबगा ४२.दया ४४.पारख ४६.सवड ४७.रजक ४९.कर्णधार ५०.मांजर ५२.गेह ५४.आड ५५.गाजर ५६.लता ५८.डझन ५९.नकलाकार ६१.रीत ६२.ततपप ६३.कानडा ६५.रस ६७.करवाल ७०.पायलट ७३.नरमादी ७५.कल ७६.करवट ७८.पालटणे ७९.भुईसपाट ८१.सनई ८२.खार ८३.काटकसर

उभे उत्तर : १.पुरातन २.पुष्पक ३.आराधना ४.रामलक्ष्मण ५.मत ६.गरम ७.राजकन्या ८.वाव ९.साईबाबा १२.आडाखा १४.बटवा १५.डीर २०.काळजी २२.शानदार २४.रहाटगाडगे २६.भंजन २७.रजई २८.अनावर ३०.तारू ३४.पालव ३६.पदक ३७.वाया ३९.काखमांजरी ४१.गार ४३.वर्ण ४४.पार ४५.फार ४६.सवलत ४८.जनन ४९.कडकडाट ५१.जरतर ५३.हडप करणे ५४.आनन ५७.तातडी ६०.कायापालट ६३.काल ६४.कलकलाट ६६.सपाट ६८.रमा ६९.वादी ७१.टर ७२.उपाय ७३.नटवा ७४.ताई ७५.कपार ७७.वरीस ७९.भुई ८०.सखा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे...



## पुणे प्रार्थना समाजात संगीतोपासनेतून भक्तिरसाची अविस्मरणीय अनुभूती

पुणे (दैनिक संध्या) : प्रार्थना समाजाच्या वतीने चैत्रोत्सवाच्या निमित्ताने आयोजित संगीतोपासनेचा कार्यक्रम अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यंदा हरी मंदिर प्रवेशाला ११७ वर्षे पूर्ण होत असल्याने या वर्षीचा उत्सव विशेष उत्साहात साजरा करण्यात आला. या संगीतोपासनेतून उपस्थितांना अध्यात्मिक शांततेचा आणि अंतर्मुखतेचा अनोखा अनुभव मिळाला. संगीतोपासनेत विश्वजीत मेस्त्री आणि सानिका सोमण यांनी सुरेल व भावपूर्ण गायन सादर केले. त्यांना दिग्विजय देशमुख (तबला) आणि संगमेश्वर तडलगी (हार्मोनियम) यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे निवेदन नमिता मुजुमदार यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात उपनिषदांतील पवित्र श्लोकांच्या उच्चारांनी झाली. 'स्वर ही परमेश्वराशी जोडणारी अतूट साखळी आहे' या भावनेतून सादर झालेल्या गायनाने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. मंगल गजराने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला आणि त्यानंतर भजनामृताचा रसिकांनी मनोभावे आस्वाद घेतला. 'जगन्नाथ मंगला जय जय परब्रह्म वत्सला' यांसारख्या भक्तिगीतांनी वातावरण अधिकच पवित्र केले. कलाकारांनी स्वरांच्या माध्यमातून सर्वत्र व्यापून असलेल्या परमेश्वराची अनुभूती अत्यंत प्रभावीपणे साकारली. यानंतर सादर झालेल्या भजनाने श्रोत्यांना स्वरांच्या सावलीत विसावण्याचा एक अद्वितीय, समाधानकारक अनुभव दिला, आणि 'प्रीती प्रभुसे जोडरे मन' यासारख्या रचनांनी कार्यक्रमाला उंची आणि आध्यात्मिक गाभा प्राप्त करून दिला. कार्यक्रमाच्या पुढील भागात विश्वजीत मेस्त्री यांनी सादर केलेला अभंग 'आनंददाता आनंद दीजे' याच्या माधुर्यपूर्ण, सुरेल आणि हृदयस्पर्शी सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भक्तिरसात तल्लीन झाले. या अभंगाच्या लयबद्धतेने आणि भावगर्भ अभिव्यक्तीने उपस्थित श्रोत्यांच्या मनावर अमिट छाप उमटवली. यानंतर विचारप्रवर्तक अभंगांची प्रभावी मांडणी सादर करण्यात आली. सानिका सोमण यांनी 'क्षण एका चित्त करुनी निवांत' आणि 'मना मनन माझिया' हे अभंग मनोज्ञ रीतीने सादर केले, तर विश्वजीत मेस्त्री यांनी 'विष्णुमय जग' या अभंगातून अध्यात्मिक चिंतनाची अनुभूती घडवली. शेवटी 'हरी भजनाविण काळ घालवू नको रे' या अभंगाने संगीतोपासनेची अत्यंत समाधानकारक, प्रसन्न आणि भावपूर्ण सांगता झाली.



## समावेशक कौशल्य परिसंस्थांसाठी जागतिक नेत्यांचे आवाहन

पुणे (दैनिक संध्या) : भारताच्या कौशल्य व शिक्षण क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत, सिम्बायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (SSPU), पुणे येथे 'जेंडर इन्क्लुजन व स्किल डेव्हलपमेंट' विषयावरील आशियातील पहिल्या युनेस्को चेअरचे उद्घाटन करण्यात आले. हे उद्घाटन केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तसेच शिक्षण राज्यमंत्री श्री जयंत चौधरी यांच्या हस्ते पार पडले. या उपक्रमाद्वारे समावेशक, भविष्याभिमुख आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक कौशल्य परिसंस्था उभारण्याच्या भारताच्या बांधिलकीला अधोरेखित करण्यात आले.या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे तसेच नॉर्वेच्या भारतातील राजदूत मोनिका नागेलगॉर्ड या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या युनेस्को चेअरचे नेतृत्व SSPU च्या प्रो-चॅन्सलर डॉ. स्वाती मुजुमदार करत असून, कौशल्य विकास क्षेत्रातील त्यांच्या दूरदृष्टीमुळे या उपक्रमाला विशेष दिशा मिळाली आहे. SSPU ने उद्योग-संलग्न कौशल्य प्रशिक्षणाचा अभिनव मॉडेल विकसित केला असून, वंचित घटकांतील युवक-युवतींना मोठ्या प्रमाणावर रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले आहे. या उपक्रमांतर्गत रोबोटिक्स, ऑटोमेशन, सेमीकंडक्टर तंत्रज्ञान, प्रगत उत्पादन आणि संरक्षण तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांत सुमारे १०,००० विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यांना आकर्षक नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. सध्या SSPU मध्ये मेकॅट्रॉनिक्स, स्मार्ट व शाश्वत ऊर्जा, डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), मशीन लर्निंग (ML) यांसारख्या उच्च-वाढीच्या क्षेत्रांत २१ पदवी, ९ पदव्युत्तर आणि पीएच.डी. कार्यक्रम सुरू आहेत. याशिवाय आर्किटेक्चर, डिजिटल मार्केटिंग, फिनटेक, लॉजिस्टिक्स, रिटेल आणि पोषणशास्त्र यांसारखे अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. SSPU ने २०२४ आणि २०२५ च्या NIRF क्रमवारीत 'स्किल युनिव्हर्सिटी' श्रेणीत देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. श्री जयंत चौधरी यांनी SSPU च्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, "अशा उपक्रमांमुळे देशातील युवकांमधील कौशल्य दरी कमी होण्यास मोठी मदत होईल." आदिती तटकरे यांनी वंचित महिलांपर्यंत कौशल्य प्रशिक्षण पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, "यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन आणि दीर्घकालीन सक्षमीकरणाला चालना मिळते.

## पुणे ग्रोथ हब प्रकल्पांचा राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. नितीन करीर यांच्याकडून आढावा

पुणे (दैनिक संध्या) : सर्वांगीण विकास आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने पुणे ग्रोथ हब अंतर्गत कार्यकारी समितीची बैठक राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. नितीन करीर यांच्या अध्यक्षतेखाली मेट्रो भवन, शिवाजीनगर येथे संपन्न झाली. पुणे ग्रोथ हब आराखडा जिल्ह्याच्या शाश्वत व गतिमान विकासासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास डॉ. करीर यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएच्या अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड, उपवनसंरक्षक महादेव मोहिते, मध्य रेल्वेचे मुख्य अभियंता गौतम कुमार, कृष्णा खोरे महामंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अभिजीत आवटे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी श्रीमती अर्चना पठारे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, आयएसईजीचे संचालक शिरीष संखे उपस्थित होते.

# रेल्वे स्थानकातील सुरक्षाव्यवस्थेची खा. डॉ. कुलकर्णी यांच्याकडून पाहणी

पुणे (दै. संध्या)



शहरातील रेल्वे स्थानकाविषयी नागरिकांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी पुणे रेल्वे स्थानकाची पाहणी करून रेल्वे प्रशासनाला धारेवर धरले. या पाहणीदरम्यान सुरक्षा व्यवस्थेत आढळून आलेल्या अनेक गंभीर त्रुटी, समस्या व असुविधांबाबत त्यांनी नाराजी व्यक्त केली. स्थानकावरील सुरक्षा यंत्रणा अत्यंत कमकुवत असून, याबाबत सविस्तर अहवाल केंद्र सरकारला सादर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "पाहणीदरम्यान स्थानकात विनातिकीट फिरणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याचे आढळले. स्वतः प्लॅटफॉर्म तिकीट काढून प्रवेश केल्यानंतरही अनेकजण कोणतीही तपासणी न करता परिसरात वावरत असल्याचे दिसून आणले.

घटना घडून गेल्यानंतरच त्रुटी लक्षात येतात, ही बाब अत्यंत गंभीर आहे. स्थानक परिसरात व्यसनाधीन व्यक्तींची वर्दळ, दारू व अमली पदार्थांचे सेवन, तसेच चोरी, अत्याचार यांसारख्या घटना वारंवार घडत असून, हे अत्यंत गंभीर आहे. या सर्व प्रकारांना जबाबदार असणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी."

सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी निधी उपलब्ध झाल्याचे समाधान असले, तरी प्रत्यक्षात तपासणी व्यवस्था प्रभावीपणे राबवली जात नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. स्थानकावर तिकीट तपासणी करणारे अधिकारी (टीसी) अपुरे असल्याने 'आओ-जाओ, घर तुम्हारा' अशी परिस्थिती निर्माण झाल्याची टीकाही त्यांनी केली.

याशिवाय, स्थानकावरील स्टॉल वाटप प्रक्रियेत स्थानिकांना प्राधान्य दिले जात नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. 'गरजू आणि स्थानिकांना संधी मिळेल अशी यंत्रणा उभी राहू शकते का, याचा विचार व्हायला हवा,' असे त्या म्हणाल्या.

या सर्व त्रुटींबाबत विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) राजेश वर्मा यांची भेट घेऊन त्यांनी चर्चा केली. पुणे रेल्वे स्थानकातील सुरक्षा व्यवस्था तातडीने मजबूत करण्याची गरज असून, याकडे आतापर्यंत दुर्लक्ष करणाऱ्यांना जबाबदार धरले जावे आणि संबंधित रेल्वे व पोलिस अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणाबाबत कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडेही लेखी तक्रार देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

स्थानिक कार्यकर्ते अनिल परदेशी यांनी स्थानकाच्या परिसरातील समस्यांबाबत वारंवार पाठपुरावा केला होता.

# मामाच्या गावी येताच हरखले चिमुकले वंचित विशेष मुलांसाठी मामाच्या गावची सफर

पुणे (दै. संध्या)

दरवर्षीप्रमाणे मामाच्या गावाला जाण्याची ओढ आणि एकदा का मामाच्या गावी पोहोचलो की आनंदाला आलेले उधाण... नाचत-गात, हसत-खेळत व्यक्त होणारा हा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता. यंदाही मामाच्या गावी आलेल्या भाचे मंडळींचे जंगी स्वागत करण्यात आले. बँडच्या गजरात नाचत, रंगबेरंगी टोप्या घातलेल्या मुलांचा उत्साह, बग्गी, उंट, घोडयाची रपेट मारत वंचित आणि विशेष मुलांचा स्वागताचा सोहळा रंगला. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, उत्साह आणि समाधान या सोहळ्याला अधिकच खास बनवून गेला. मामाच्या गावी झालेल्या या जंगी स्वागताने प्रत्येकाच्या मनात आनंदाची सुंदर आठवण कोरली गेली.

शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ ट्रस्ट व पुणेकरांच्या सहभागाने मामाच्या गावची सफर हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला आहे. मामाच्या गावची सफर या उपक्रमाचे यंदा २७ वे वर्ष आहे. पुढील दोन दिवस भरगच्च उपक्रमांचे आयोजन भाचे मंडळींसाठी करण्यात आले आहे.

यावेळी आमदार हेमंत रासने, नगरसेवक अजय खेडेकर, कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित, सिद्धी शिळीमकर, सई थोपटे, स्नेहा माळवदे, स्वीकृत नगरसेवक राजेंद्र काकडे,अॅड. प्रताप परदेशी, आनंद सराफ, विश्वास भोर, पीयुष शाह, कुमार रेणुसे, सागर घम, राजू कांबळे, सेवा मित्र मंडळाचे शिरीष मोहिते,



मंडळाचे अध्यक्ष नितीन होले, अमर लांडे, विक्रांत मोहिते, उमेश कांबळे, सचिन ससाने, मित नानावटी, नमन कांबळे, स्वामी महाले यावेळी उपस्थित होते.

मामाच्या गावची सफर या उपक्रमासोबतच दृष्टीहिन असलेल्या जोडप्यांच्या विवाह सोहळ्याचे आयोजन देखील केले जाते. लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्था यांच्या समवेत या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते.

दिनांक २४ एप्रिल रोजी संध्याकाळी लुई ब्रेल अंध अपंग संस्थेच्या वतीने ऑर्केस्ट्राचा विशेष कार्यक्रम होणार आहेयासोबतच मेहंदीचा कार्यक्रम देखील होणार आहे.

दिनांक २५ एप्रिल रोजी भाचे मंडळींचा निरोप समारंभ होणार आहे. दिनांक २६ एप्रिल रोजी अंध भगिनींचा विवाह सोहळा संपन्न होणार आहे. विवाह सोहळ्यापूर्वी साखरपुडा आणि हळदीचा कार्यक्रम होणार आहे. विवाहाचे धार्मिक विधी दुपारी २ वाजता तर ४.३० वाजता नवरदेवाची वरात निघणार आहे. मुख्य विवाह सोहळा सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे.

शिरीष मोहिते म्हणाले, अनाथ आश्रमातील मुले-मुली मामाच्या गावच्या सफरीचा आनंद घेण्यासाठी दरवर्षी आतुरतेने वाट पहातात. दोन ते तीन दिवस भाचे मंडळी मुक्कामी असतात. अनाथ आणि विशेष मुलांना मामाच्या गावी येऊन सुट्टीमध्ये मजा करता यावी, यासाठी उपक्रमाचे आयोजन केले जाते. माहेर - भीमा कोरेगाव, संस्कार बाल आश्रम राशीन, स्नेहप्रेम सामाजिक प्रतिष्ठान कर्जत नगर, संतुलन निवासी पाषाण, बचपन वर्ल्ड फोरम हडपसर, आपले घर डोणजे संस्थातील २२५ पेक्षा अधिक मुले उपक्रमात सहभागी झाले आहेत.

## महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या संचालकपदी मंगेश जोशी यांची नियुक्ती

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाने नुकत्याच केलेल्या प्रशासकीय बदल्यांनुसार, श्री. मंगेश जोशी (भा.प्र.से) यांची महाराष्ट्र पर्यटन संचालनालयाच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. श्री. जोशी यांनी येथील पर्यटन संचालनालयाच्या मुख्यालयात आपल्या पदाचा अधिकृत कार्यभार स्वीकारला.

श्री. मंगेश जोशी हे अनुभवी प्रशासकीय सनदी अधिकारी असून, या नियुक्तीपूर्वी त्यांनी पुणे येथील 'यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी' (यशदा) येथे उपमहासंचालक म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. प्रशासकीय सुधारणा, धोरणात्मक नियोजन आणि प्रशिक्षण क्षेत्रात त्यांचा अनुभव असून, त्यांच्या या अनुभवाचा उपयोग आता राज्याच्या पर्यटन विकासासाठी होणार आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना श्री. मंगेश जोशी म्हणाले , "महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने समृद्ध राज्य आहे. पर्यटन विभागाच्या विद्यमान धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि राज्यातील पर्यटन स्थळांची जागतिक स्तरावर व्यापक प्रसिद्धी करणे ही प्राथमिकता असेल. महाराष्ट्राला जागतिक पर्यटन नकाशावर एक अग्रगण्य आणि सुरक्षित पर्यटन स्थळ म्हणून नव्याने ओळख मिळवून देण्याचा मानस आहे.

## "रिफ्लेक्शन्स" कला प्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन

पुणे (दै. संध्या)

बालगंधर्व कलादालन येथे "रिफ्लेक्शन्स" या विशेष कला प्रदर्शनाचे उद्घाटन आज गुरुवारी सकाळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. सेठ दगडूराम कटारिया हायस्कूलचे ५० हून अधिक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत कार्यरत असतानाही कलेच्या माध्यमातून एकत्र आलेले पाहून समाधान वाटते, असे मत व्यक्त करत *पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम* यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. *"विविध व्यावसायिक क्षेत्रांत काम करणारे विद्यार्थी आजही कलेमुळे आणि आपल्या प्रिय



शिक्षिकेमुळे एकत्र राहिले आहेत, ही संकल्पना अत्यंत अनोखी आहे. अशा प्रदर्शनांमुळे दैनंदिन तणावातून दिलासा मिळतो. आमच्यासारख्या शासकीय अधिकाऱ्यांनाही अशा उपक्रमांतून लोकांना आणि त्यांच्या कामाला जवळून जाणून घेण्याची संधी मिळते,"* असे ते म्हणाले.

या प्रसंगी प्रा. डॉ. नचिकेत ठाकूर आणि अभिनेत्री रुजुता देशमुख यांचीही प्रमुख उपस्थिती होती. "कटारीयन्स आर्ट ग्रुप"च्या माध्यमातून आयोजित या प्रदर्शनात चित्रकला, स्केचिंग, वॉटरकलर आदी विविध माध्यमांतील कलाकृतींचे सादरीकरण करण्यात आले आहे.

या उपक्रमामागे कला शिक्षिका शैलजा पाठक मॅडम यांचे मार्गदर्शन असून, त्यांच्या प्रेरणेनेच विद्यार्थ्यांनी कलेशी असलेले नाते जपले आहे. प्रदर्शनाला पहिल्याच दिवशी पुणेकर रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

हे "रिफ्लेक्शन्स" प्रदर्शन दि. २३, २४ आणि २५ एप्रिल २०२६ दरम्यान सर्वांसाठी खुले राहणार आहे. प्रदर्शनाचे ठिकाण बालगंधर्व कलादालन, पुणे असून, दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७.३० या वेळेत रसिकांना भेट देता येईल.

# खरीप हंगाम २०२६ पूर्वतयारीबाबत खत व बियाणे विक्रेत्यांना निर्देश

## खत उत्पादक कंपन्या, बियाणे उत्पादक, वितरक, वाहतूकदार, नोडल एजन्सी आणि संबंधित अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना

पुणे (दै. संध्या)

खरीप हंगाम २०२६ मध्ये शेतकऱ्यांना रासायनिक खते व बियाण्यांचा सुरळीत आणि पुरेसा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय संरक्षित साठा सनियंत्रण समिती तसेच जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा सनियंत्रण समितीची आढावा बैठक दि. २२ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत पुणे जिल्ह्यातील खत उत्पादक कंपन्या, बियाणे उत्पादक, वितरक, वाहतूकदार, नोडल एजन्सी आणि संबंधित कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना प्रशासनाने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

बैठकीस जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. संजय काचोळे, कृषी विकास अधिकारी श्री. अजित पिसाळ, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक श्री. धनंजय पाटील तसेच महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, सहकारी विकास महामंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. काचोळे यांनी सांगितले की, खरीप हंगामात खत व बियाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी सर्व कंपन्यांनी कृषी आयुक्तालयाकडून प्राप्त आवंटनानुसार वेळेत पुरवठा करणे आवश्यक आहे. मंजूर साठ्यापैकी जास्तीत जास्त खत पुरवठा एप्रिल, मे आणि जून महिन्यात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः जिल्ह्याच्या पश्चिम भागात पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्तेमार्गे खत पोहोचविण्यावर भर देण्यात आला.

दौंड, बारामती आणि सासवड रोड येथील रेल्वे स्थानकांवर



खत वाहतुकीस सिमेंट व इतर मालवाहतुकीपेक्षा प्राधान्य देण्याबाबत रेल्वे प्रशासनाशी समन्वय ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. युरिया व डीएपी खताची रेक जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी तालुकानिहाय पुरवठा नियोजन संबंधित कृषी विकास अधिकाऱ्यांकडून मंजूर करून घेणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

वाहतूकदारांच्या करारातील विलंबामुळे खतपुरवठा विस्कळीत होऊ नये, यासाठी सर्व कंपन्यांनी वाहतूक करार वेळेत नूतनीकरण करावेत, अन्यथा संबंधित कंपनीस जबाबदार धरण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला. जिल्ह्यातील सर्व भागांमध्ये खताचे संतुलित वितरण व्हावे आणि कोणत्याही तालुक्यात कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये यासाठी कंपन्यांनी दक्षता घेण्याच्या सूचना करण्यात आल्या.

रासायनिक खतांसोबत अनावश्यक किंवा मागणी नसलेल्या उत्पादनांची सक्ती विक्रेत्यांवर करू नये, असे स्पष्ट करण्यात आले. अशा तक्रारी आढळल्यास संबंधित कंपनी किंवा वितरकावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.

संरक्षित खत साठ्याबाबत जिल्ह्यासाठी नियुक्त नोडल एजन्सींनी एप्रिल अखेर किमान ६० टक्के आणि मे अखेर १०० टक्के बफर स्टॉक उभारण्याचे निर्देश देण्यात आले. बफर स्टॉक करणाऱ्या एजन्सींनी तालुका कृषी अधिकारी आणि गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांशी सातत्याने संपर्क ठेवून कोणत्याही तालुक्यात खताची कमतरता भासणार नाही याचे नियोजन करण्यास सांगण्यात आले

बियाणे पुरवठ्याबाबत कृषी विकास अधिकाऱ्यांनी बियाणे कंपन्या आणि वितरकांची स्वतंत्र बैठक घेऊन पेरणी क्षेत्रानुसार आवश्यक बियाणे उपलब्ध राहील याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. विशेषतः इंद्रायणी भात व उडीद बियाण्याचा पुरेसा साठा ठेवण्यावर भर देण्यात आला. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास बाजरी, सोयाबीन आणि भात या पिकांचे अतिरिक्त बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी कंपन्यांनी तयारी ठेवावी, असेही स्पष्ट करण्यात आले.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी खत व बियाणे पुरवठा साखळीतील सर्व घटकांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन प्रशासनाने यावेळी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पेटीएम क्यू आर मेट्रो तिकीट सेवासाठी महा मेट्रो आणि ओएनडीसी सोबत भागीदारी

पुणे (दैनिक संध्या) : पेटीएम (वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड) ने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (महा मेट्रो) आणि ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (ओएनडीसी) सोबत भागीदारी करून पुणे आणि नागपूरमधील मेट्रो प्रवाशांसाठी मोबाइल क्यू आर तिकीट सेवा सुरू केली आहे. या सुविधेमुळे प्रवासी आता थेट पेटीएम ॲपवर मेट्रो तिकीट बुक करू शकतात आणि स्टेशनवर प्रवेशासाठी क्यू आर कोड मिळवू शकतात. यामुळे फिजिकल टोकनची गरज उरत नाही आणि स्टेशनवरील प्रतीक्षा वेळ कमी होतो, ज्यामुळे प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होतो. ही सेवा दोन्ही शहरांमधील दररोज ३ लाखांहून अधिक प्रवाशांना लाभदायक ठरण्याची अपेक्षा आहे. पेटीएम प्रवक्त्यांनी सांगितले, "ही भागीदारी पुणे आणि नागपूरमधील प्रवाशांसाठी दैनंदिन प्रवास अधिक सोपा करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. मोबाइल क्यू आर तिकीट सेवेमुळे वापरकर्त्यांना पेटीएम ॲपवर तिकीट त्वरित मिळते, ज्यामुळे बुकिंगपासून प्रवासापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया अधिक जलद आणि सोयीस्कर होते."

### स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना काटेकोरपणे वृत्तपत्र वाचन करण्याची गरज

पिंपरी (दैनिक संध्या) : स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना चालू घडामोडींची माहिती ठेवण्यासाठी दररोज काटेकोरपणे वृत्तपत्र वाचन करण्याची गरज आहे. तसेच शैक्षणिक अभ्यास आणि अवांतर वाचन सातत्याने सुरु ठेवावे. मी मराठी वाङ्मय आणि इतिहास हा विषय घेऊन यूपीएससी ची परीक्षा उत्तीर्ण झालो. ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं हे माझे स्पष्ट मत आहे. जर स्पर्धा परीक्षेत अपयश आले तर आपल्याकडे प्लॅन बी तयार असला पाहिजे असे मार्गदर्शन तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. महेश भागवत यांनी पीसीईओई मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये डॉ. महेश भागवत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन भागवत यांचे स्वागत केले. यावेळी उपाध्यक्ष पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शितल कुमार रवंदळे आदी उपस्थित होते.

# नवीन 'बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस' भारतात लॉन्च

**पुणे (दै. संध्या) :**

बीएमडब्ल्यू मोटोरॅड इंडियाने आज भारतीय बाजारपेठेत नवीन 'बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस' अधिकृतपणे लॉन्च केली आहे. बहुप्रतिक्षित असलेली ही मोटारसायकल बीएमडब्ल्यू मोटोरॅड इंडियाच्या सर्व डीलर नेटवर्कवर बुकिंगसाठी उपलब्ध असून, जून २०२६ पासून तिचे वितरण सुरू होईल. बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएसची रचना जर्मनीमध्ये बीएमडब्ल्यू मोटोरॅडद्वारे करण्यात आली असून तिचे उत्पादन भारतात स्थानिक पातळीवर केले जाईल. 'जीएस' म्हणजे रस्ता असो वा खडतर मार्ग, सर्व ठिकाणी साथ



देणारा एक "सर्वोत्तम सोबती". बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस ख्या अर्थाने जीएसचा मूळ गाभा प्रतिबिंबित करते - मोटारसायकलवर स्वार व्हा, थ्रॉटल फिरवा आणि पूर्ण नियंत्रण व जास्तीत जास्त आत्मविश्वासासह प्रवासाचा आनंद घ्या. याप्रसंगी बोलताना बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. हरदीप सिंग ब्रार म्हणाले, "नवीन बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस ही साहसी रायडर्सच्या नवीन पिढीसाठी तयार करण्यात आली असून, याद्वारे जीएस वारशाचा एक धाडसी नवा अध्याय सुरू होत आहे. भारतातील वैविध्यपूर्ण रस्ते आणि प्रवासाची परिस्थिती लक्षात घेऊन, या प्रीमियम मोटारसायकलमध्ये आयकॉनिक जीएस डिझाइन, उत्कृष्ट कामगिरी आणि प्रगत तंत्रज्ञानाचा मिलाफ करण्यात आला आहे. यामुळे शहरातील रस्ते, महामार्ग आणि खडतर पायवाटांवर प्रवास करताना रायडर्सना कमालीचा आत्मविश्वास मिळेल. आमचे उद्दिष्ट अधिकाधिक रायडर्सना साहसाचा थरार अनुभवण्यासाठी प्रेरित करणे आणि भारतातील निरंतर विकसित होत असलेल्या मोटारसायकल संस्कृतीत सक्रिय भूमिका बजावणे हे आहे. बीएमडब्ल्यू मोटोरॅडसाठी भारत ही एक धोरणात्मक बाजारपेठ आहे आणि एफ ४५० जीएस ही आमचा हा प्रवास अधिक वेगवान करण्यासाठी, ग्राहकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आणि प्रत्येक रायडरला ख्या अर्थाने जगाला आपले क्रीडांगण बनवण्यासाठी दिलेली वचनबद्धता आहे." बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएस या मॉडेलच्या प्रारंभिक एक्स-शोरूम किंमती पुढीलप्रमाणे आहेत: बेस व्हेरिएंटची किंमत ४,७०,००० रुपये असून, एक्सक्लुझिव्ह व्हेरिएंट ४,९०,००० रुपयांना उपलब्ध आहे. तर जीएस ट्रॉफी व्हेरिएंटची किंमत ५,३०,००० रुपये आहे.

नवीन बीएमडब्ल्यू एफ ४५० जीएसचे डिझाइन साहसी वृत्तीचे दर्शन घडवते, ज्यामध्ये संक्षिप्त प्रमाण आणि सुबक रचना यांचा सुरेख संगम आहे. 'जीएस' कुटुंबातील या नवीन सदस्यामध्ये पारंपरिक 'जीएस' डिझाइन तत्त्वज्ञान स्पष्टपणे दिसून येते. या मोटारसायकलच्या दर्शनी भागात 'X' आकाराची फुल एलईडी हेडलाइट हे तिचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. समोरच्या 'बीक'पासून सुरू होणारी 'फ्लायलाइन' टाकी आणि सीटवरून थेट मागील अरुंद भागापर्यंत जाते. वैशिष्ट्यपूर्ण 'बीक' काळ्या रंगात असून बाजूचे पॅनेल्स बॉडी कलरमध्ये आहेत. 'जीएस'चे वैशिष्ट्य असलेले 'टूथ' मेट डायम सिल्व्हर मेटॅलिक फिनिशमध्ये देण्यात आले आहे.

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रशिक्षण केंद्रास भेट

**पिंपरी चिंचवड (दै. संध्या) :**

महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या जनगणना प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज ड क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक २६ मधील कै. मारुती गेनू कस्पटे प्राथमिक शाळा येथे आयोजित प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार तसेच चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे उपस्थित होते.

आयुक्तांनी प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती जाणून घेतली. प्रशिक्षणाची गुणवत्ता, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक केले. प्रशिक्षणादरम्यान कर्मचाऱ्यांना जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, घरगुती सर्वेक्षणाची पद्धत, अचूक माहिती संकलन तसेच नागरिकांशी प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले जात असल्याचा त्यांनी पाहिले.

# शाओमीकडून भारतात रेडमी ए७ आणि रेडमी ए७ प्रो लॉंच

## रेडमी ए७ सिरीजमध्ये ६४ जीबी स्टोरेज आणि एलपीडीडीआर४एक्स रॅम

**पुणे (दै. संध्या) :**

शाओमी इंडियाने भारतात रेडमी ए७ सिरीजच्या लॉंचची घोषणा केली आहे. विश्वासार्हता, आकर्षक डिस्प्ले आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या बॅटरी परफॉर्मन्सवर लक्ष केंद्रित करून कंपनीने आपल्या परवडणाऱ्या स्मार्टफोन पोर्टफोलिओचा विस्तार केला आहे.

रेडमी ए७ मध्ये ६.८८-इंचाचा मोठा डिस्प्ले देण्यात आला आहे, तर रेडमी ए७ प्रो मध्ये ६.९-इंचाचा HD+ डिस्प्ले असून तो १२०Hz पर्यंतच्या रिफ्रेश रेटला सपोर्ट करतो; यामुळे अधिक नितळ दृश्ये आणि पाहण्याचा अधिक प्रवाही अनुभव मिळतो. ग्राहकांची सुलभता लक्षात घेऊन या डिस्प्लेला डोळ्यांच्या संरक्षणासाठी ट्रिपल टीयूव्ही ऱ्हेनलँड सर्टिफिकेशन मिळाले आहे. तसेच, विविध परिस्थितींमध्ये स्क्रीनचा प्रतिसाद कायम राखण्यासाठी वात वेट टच तंत्रज्ञान देण्यात आले आहे. रेडमी ए७ सिरीजमध्ये ६४ जीबी स्टोरेज आणि एलपीडीडीआर४एक्स रॅम देण्यात




आली आहे. उत्तम मल्टिटास्किंग आणि ॲप्लिकेशन्स वापरताना वेगवान अनुभवासाठी दोन्ही डिवाईसेसमध्ये व्हर्च्युअल रॅम विस्ताराचा पर्याय उपलब्ध आहे. याशिवाय, या सिरीजमध्ये १३ मेगापिक्सल रिअर कॅमेरा आणि ८ मेगापिक्सल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे, जो फोटोग्राफी, व्हिडिओ कॉल्स आणि दैनंदिन वापरासाठी दर्जेदार निकाल देतो.

रेडमी ए७ आणि रेडमी ए७ प्रो ची अनुक्रमे किंमत रु.१०,४९९ आणि रु. ११,४९९ असणार आहे. रेडमी ए७ सिरीज Mi.com, ॲमेझॉन इंडिया, फ्लिपकार्ट आणि शाओमी रिटेल आऊटलेट्समध्ये उपलब्ध आहे, तसेच विक्रीला २४ एप्रिलपासून सुरूवात होईल.

## उद्योग क्षेत्रात येऊन समाजासाठी कार्य करा – बिशप सायमन अल्मेडा

**पुणे (दै. संध्या) :**

अल्पसंख्यांक ख्रिश्चन समाजाने शिक्षण व आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. आता उद्योजकतेच्या क्षेत्रात पुढे येऊन समाजासाठी मोठे योगदान द्यावे, असे आवाहन बिशप सायमन अल्मेडा यांनी केले.

पुणे शहरातील अल्पसंख्यांक ख्रिश्चन उद्योजक व व्यावसायिकांच्या 'मायनॉरिटी अँड इंडियन ख्रिश्चन मेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री' या संस्थेच्या स्थापनेचा समारंभ शुक्रवारी ढोले पाटील रस्त्यावरील मारिया असुंटा कॉन्व्हेंटच्या सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी बिशप सायमन अल्मेडा,पास्टर पिटर जॉर्ज तसेच इंडो-इस्रायल चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष गुल क्रिपलानी ऑनलाईन पद्धतीने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

एनआयसीएईचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. विशाल मोरेश्वर,पिटर डिसुझा, जयकर राव,राहुल डंबाळे, खिसाल जाफरी आदी विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित होते. याशिवाय अल्पसंख्यांक समुदायातील उद्योजक, तज्ज्ञ आणि विविध क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे आध्यात्मिक संचालक फादर एन्थनी डिसूझा, पीटर जॉर्ज, मारिया गोरेट्टी तसेच उद्योगपती पीटर डिसूझा यांचीही उपस्थिती होती.

## नेटवर्क्स डिजिटल जीवनाला कसे सक्षम करतात हे दर्शवणारे ट्रेंड्स

**पुणे (दै. संध्या) :**

भारतातील कनेक्टिव्हिटी आता वेगळेपण दर्शवणारा घटक राहिलेली नाही; ती एक पायाभूत सुविधा बनली आहे. वीज किंवा बँकिंगप्रमाणेच, दैनंदिन जीवनाला आकार देणाऱ्या डिजिटल क्षणांना चालना देत, ती विश्वसनीयपणे, सातत्याने आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय कार्यरत राहणे अपेक्षित आहे.

आजचा बदल हा वेगवान नेटवर्क्सबद्दल कमी आणि वाढत्या डिजिटल समाजाला कशा प्रकारे कनेक्टिव्हिटीच्या भूमिकेबद्दल अधिक आहे. अपेक्षा बदलत असल्यामुळे, सेवा पुरवठादारांवर सेवा वितरणाच्या पलीकडे जाऊन, स्वतःला अखंड आणि नेहमी उपलब्ध असणाऱ्या अनुभवांचे विश्वसनीय प्रवर्तक म्हणून स्थापित करण्यासाठी दबाव येत आहे.

ऑलवेज ऑन इंडिया घडवणारे महत्त्वाचे ट्रेंड्स पुढीलप्रमाणे आहेत:

1) वेगापेक्षा विश्वसनीयता अधिक महत्त्वाची आहे- ग्राहक आता बँडविड्थबद्दल क्वचितच बोलतात. त्याऐवजी, त्यांचे लक्ष व्यत्ययांकडे जाते. बँकिंग अलर्ट चालू असताना कॉल ड्रॉप होणे, डिजिटल पेमेंट करताना विलंब होणे, किंवा कामाच्या मध्येच नेटवर्कमध्ये अडथळा येणे, यावरून आता गैरसोय म्हणून पाहिले जात नाही, तर पायाभूत सुविधांचे अपयश म्हणून पाहिले जाते. यामुळे अपेक्षांचे स्वरूपच बदलले आहे. आता नेटवर्कचे मूल्यमापन सातत्य, अपटाइम आणि पूर्वानुमानक्षमतेवर केले जाते, सर्वोच्च कामगिरीवर नाही. आजची सर्वोत्तम कनेक्टिव्हिटी ती आहे, ज्याबद्दल वापरकर्त्यांना अजिबात विचार करण्याची गरज भासत नाही.

2) सुरक्षितता ही कनेक्टिव्हिटीची मुख्य अपेक्षा बनली आहे

भारताचा डिजिटल विस्तार वाढल्याबरोबर जोखीमही वाढल्या आहेत. स्कॅम कॉल्स, फिशिंग प्रयत्न आणि आर्थिक फसवणूक आता दैनंदिन जीवनाचा भाग बनले आहेत. ग्राहकांना आता सेवा प्रदात्यांकडून फक्त प्रवेश नव्हे तर संरक्षणाचीही अपेक्षा आहे. डिजिटल वापर वाढत असताना, सुरक्षितता ही वापरकर्त्यांची जबाबदारी न राहता कनेक्टिव्हिटीचा अंगभूत भाग बनली आहे. याला प्रतिसाद म्हणून, ऑपरेटर्स एआय-आधारित नेटवर्क बुद्धिमत्तेचा वापर करून मोठ्या प्रमाणावर सुरक्षा प्रदान करत आहेत. यात संशयास्पद कॉल्स आणि संदेश ओळखून ब्लॉक करणारी प्रणाली, संभाव्य फसवणुकीबद्दल रिअल-टाइम अलर्ट, आणि उदयोन्मुख धोके ओळखण्यासाठी सतत नेटवर्क मॉनिटरिंग यांचा समावेश आहे. हे उपाय वापरकर्त्यांपर्यंत धोके पोहोचण्यापूर्वीच त्यांना अडवतात.

3) ग्राहक-केंद्रितता वैशिष्ट्य-आधारित नवोपक्रमाची जागा घेत आहे.

स्पर्धात्मक फायदा आता वेगळ्या फीचर्सपेक्षा समस्या सोडवण्यावर आधारित आहे. आधुनिक कनेक्टिव्हिटी सेवा ग्राहकांच्या अडचणी, सुरक्षा, साधेपणा आणि मानसिक शांतता यांवर आधारित तयार केल्या जातात. हे उद्योगातील व्यापक बदल दर्शवते यश आता योजना विकण्यात नसून दैनंदिन डिजिटल अनुभवातील अडथळे कमी करण्यात आहे.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः, ओतुर ( पाथरटवाडी) ता. जुन्नर, जि. पूणे येथिल व परिसरात सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते कि,

गाव मौजे ओतुर,( पाथरटवाडी)ता. जुन्नर, जि. पुणे येथिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. नामदेव विठ्ठल पानसरे रा.पाथरटवाडी, ओतुर ता. जुन्नर जि.पुणे यांचे वडिलार्जित मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताबे वहिवाटीस असुन् त्यांनी सदर मिळकत आमचे आशिलास कायमखुश खरेदी देण्याचे ठरविले असून त्या संदर्भात अंतिम बोलणी सुरू आहेत. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असून खरेदी, विक्री, गहाण, दान, लिज, साठेखत, खरेदीखत, मृत्यूपत्र, करारमदार, कुळवहिवाट, विसारपावती, वाटणी, चोळी बांगडी, किंवा इतर कोणत्याही स्वरूपात दावा, मालकी हक्क हितसंबंध असल्यास नोटीस दिल्यापासून आठ दिवसांचे आत वकिलांसमोर अस्सल कागदपत्रांसहित हजर राहुन आमची खात्री पटवून द्यावी. वरील मुदतीमध्ये कोणचीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमीआहे किंवा संबंधितांनी त्यांचे असलेले हक्क व अधिकार जाणिवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून आमचे आशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणचीहि कोणत्याहि प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन : तुकडी व जिल्हा परिषद पुणे पोट तुकडी तालुका जुन्नर, पंचायत समिती जुन्नर पैकी ग्रामपंचायत ओतुर (पाथरटवाडी) येथिल व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दितील मिळकत -

| स. नं. | क्षेत्र. हे. आर | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ८५१/१ | १.०१० | ३.३५ |
| | ०.०६ | |
| ८५१/३ | १.०१० | ३.३५ |
| | ०.०६ | |
| | ------------ | |
| एकूण | २.०२. | ६.५ |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत त्यातील लाकुड, माती, दगड, धोंडा तसेच त्यामधील इतर तंगदभूत वस्तूसहित तसेच सदर जागेमध्ये येणेजाण्याचे व वहिवाटीचे हक्कासहित व अधिकार सुद्धा मिळकती कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखून न ठेवता मिळकत.

दि : 23/04/2026
येणेप्रमाणे जाहिर नोटीस
ठिकाण : जुन्नर

सही/-
अँड. रोहिणी एल. गाडेकर
नोटरी भारत सरकार ओतुर ता. जुन्नर, जि. पुणे
मोबा. ९८६०४८३०३१

# मराठा लाइट इन्फंट्रीच्या १६ भैरव बटालियनला दगडूशेठ गणपतीची पंचधातूची मूर्ती सुपूर्द

**पुणे (दै. संध्या) :**

भारतीय लष्करातील मराठा लाइट इन्फंट्रीतील सैनिकांची दगडूशेठ गणपतीशी निगडित असलेली श्रद्धा आणि परंपरा जपत, नव्याने स्थापन झालेल्या तसेच संवेदनशील भागात किंवा घटनांच्या वेळी कार्यरत राहण्यासाठी विशेष प्रशिक्षित असलेली १६ भैरव बटालियनला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची पंचधातूची मूर्ती सन्मानपूर्वक सुपूर्द करण्यात आली. बटालियनच्या मागे गणपती बाप्पाचा आशीर्वाद कायम रहावा, या भावनेतून ही मूर्ती देण्यात आली आहे.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे मंदिरात ही मूर्ती सुपूर्द करण्यात आली. मराठा लाइट इन्फंट्री गणपती मूर्ती देण्याची परंपरा पूर्वीपासून सुरू असून, त्याच परंपरेचा भाग म्हणून १६ भैरव बटालियनने दगडूशेठ गणपतीची मूर्ती देण्याची विनंती लेफ्टनंट कर्नल रणजीत सिंह सिनसिनवार यांनी सैनिकांच्या वतीने केली होती. त्यानुसार विधिवत पूजा करून सुमारे दीड फूट उंचीची पंचधातूची मूर्ती बटालियनच्या प्रतिनिधींना नुकतीच प्रदान करण्यात आली.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, राजू चिंचोरकर आदी उपस्थित होते. सदर बटालियन, मंदिराची प्रारंभिक स्थापना बेळगाव येथे करणार आहे. त्यानंतर बटालियनच्या ऑपरेशनल तैनातीप्रमाणे या मंदिराचे स्थलांतर अरुणाचल प्रदेशातील सीमावर्ती भागात करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी म्हणाले, भारतीय लष्करातील मराठा लाइट इन्फंट्रीला आम्ही नेहमीच गणपती बाप्पाची मूर्ती देत आलो आहोत. बाप्पाचा आशीर्वाद व पाठबळ त्यांच्या पाठीशी कायम राहावा, हीच आमची भावना आहे. १६ भैरव बटालियनसाठीही हीच श्रद्धा आणि भावनेतून मूर्ती सुपूर्द करण्यात आली आहे, देशसेवेत असलेल्या आपल्या जवानांना यामुळे मानसिक आणि आध्यात्मिक बळ मिळेल.

आपल्या संस्कृतीमध्ये श्री काळभैरव आणि गणेश मंदिरात नेहमी भैरव ही देवता रक्षणकर्ता म्हणून सज्ज असते. त्याचप्रमाणे ही बटालियन देशासाठी ऑपरेशन सिंदूर सह विविध महत्त्वाच्या घटनांमध्ये संरक्षण सज्जतेसाठी तयार करण्यात आली आहे.

## जाहीर सिलबंद दरपत्रके

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे घटकाचे शासकीय वाहनांसाठी १) टायर पंक्चर, ओपनिंग फिटींग, व्हील अलायमेंट व बॅलेन्सींग कामे, २) मशनिंगची कामे (इंजीन, हेड, इंजीन, ब्लॉक, ड्रम कटिंग इत्यादी), ३) वाहनाचे डेंटिंग पेंटिंग व कलरींग कामे, वेल्डींगची कामे, ४) पाट्यांची दुरुस्तीची कामे, ५) ऑईल/कॉटनवेस्ट / डिस्ट्रील वॉटर खरेदीची कामे, ६) मॅकेनिक कामे, ७) शासकिय वाहनांना लाईट, सायरन व पीए सिस्टीम, ८) DPF, EGR, TURBO, SENSOR साहित्य खरेदी/दुरुस्तीची कामे, ९) सीट कुशनींग दुरुस्तीची कामे १०) रेडीयमची कामे, ११) रेडिएटरची कामे (दुरुस्ती, शोल्डींग, वेल्डींग), १२) वाहनाची पी.यु.सी., १३) ए.सी. दुरुस्तीची कामे, १४) शासकिय फ्लॅग/मोनोग्राम/मोनोग्राम बॉक्स बसविणे, १५) शासकीय वाहनांना बॅटरी खरेदी, १६) क्रेन दुरुस्ती, १७) ॲक्सेसरिजची कामे, १८) शासकीय वाहनांसाठी टायर खरेदी करणे, १९) वाहनांच्या दरवाज्याची दुरुस्तीची कामे, २०) टायर रिट्रेडींग आणि कट दुरुस्ती करणे इ. पुरवठा करणेबाबत इच्छुक व अधिकृत मान्यताप्राप्त पुरवठा / दुरुस्तीदार यांचेकडून सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता सिलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**दरपत्रकाची संपूर्ण माहिती, अटी व शर्ती www.puneruralpolic.gov.in या वेब साईटवर फक्त पाहण्यास उपलब्ध आहेत.**

पुणे
दिनांक : ०२/०५/२०२६

शिक्का

सही/-
(संदीप सिंह गिल्ल) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण

विमाका/पुणे/जाहि./१९/२०२६-२७

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः गावं मौजे हिवरे बुद्रुक, तालुका जुन्नर, जि. पुणे व परिसरातील लोकांस आमचे आशिल श्री लक्ष्मण रामभाऊ पवार रा. निघोटवाडी ता. आंवेगावं जि. पुणे यांनी प्रत्यक्ष सांगितल्यावरून व दिलेल्या माहिती प्रमाणे जाहीर रित्या कळविण्यात येते ते येणेप्रमाणे,

खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीशी आमचे आशिल श्री. लक्ष्मण रामभाऊ पवार अगर आमचे आशिलांचे कुटुंबियांचा कोणताही हितसंबंध केव्हाही नव्हता व नाही. परंतु हिवरे बुदुक येथील गट नं. ८१८ क्षेत्र ०.४६ आर या शेतजमीनीवर हौसावाई रामभाऊ पवार असे नाव असल्याने व आमचे आशिलांचे नाव लक्ष्मण रामभाऊ पवार असे असल्याने जुन्नर तालुक्यातील श्री. सचिन संपत शेळके व त्यांचेसोवत असलेले अनोळखी इसमांनी आमचे आशिलांचे अशिक्षीतपणाचा व अज्ञानाचा गैरफायदा घेवुन आमचे आशिलांची दिशाभुल करून अनेक कागदपत्रांवर सहया घेतल्या आहेत. त्यावावत आमचे आशिलांनी श्री सचिन संपत शेळके यांना वेळोवेळी विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिलेली आहेत.

हौसावाई रामभाऊ पवार यांचे वारसनोंदीचे फेरफारावावत मंडल अधिकारी यांचेकडे तकार अर्ज दाखल झाल्यावावत आमचे आशिलांस समजल्यानंतर आमचे आशिल स्वतः मंडल अधिकारी कार्यालय नारायणगावं यांचेकडे हजर होवुन आमचे आशिलांनी योग्य व वस्तुनिष्ठ जवाव मंडल अधिकारी यांना देवुनही मंडल अधिकारी नारायणगावं यांनी चुकीचा निकाल दिलेला आहे. तसेच सदर निकालावावत आमचे आशिलांचे मुखत्यार म्हणुन श्री. सचिन संपत शेळके यांनी मंचर येथील उपविभागीय अधिकारी साो. जुन्नर-आंवेगावं यांचे कोर्टात कॅव्हेट दाखल केलेले आहे. आमचे आशिलांनी केंव्हाही श्री. सचिन संपत शेळके अगर कोणासही केंव्हाही हिवरे वुद्रुक येथील गट नं. ८१८ क्षेत्र ०.४६ आर या शेतजमीनीवावत अगर कोणत्याही मिळकतीवावत स्वतःचे कुलमुखत्यार नेमलेले नव्हते व नाही. यदाकदाचित श्री. सचिन संपत शेळके यांनी आमचे आशिलांची वनावट सही करून व आमचे आशिलांचे कागदपत्रांचा दुरूपयोग करून एखादे रजिस्टर अथवा नोटरी कुलमुखत्यारपत्र/नोटरी मुखत्यारपत्र (Power of Attorney) अस्तित्वात आणले असेल वावत आमचे आशिलांस आता खात्री झाली आहे. सदर रजिस्टर अथवा नोटरी कुलमुखत्यारपत्र/नोटरी मुखत्यारपत्राचा (Power of Attorney) वापर करून श्री. सचिन संपत शेळके अगर त्यांचेसोवत असणारे इसम हे फसवणुक व दिशाभुल करून वेकायदेशिर व्यवहार करणेच्या प्रयत्नात असलेवावत आमचे आशिलांस समजले आहे.

तसेच श्री. सचिन संपत शेळके यांनी आमचे आशिलांची वनावट सही करून व आमचे आशिलांचे कागदपत्रांचा दुरूपयोग करून रजिस्टर अथवा नोटरी कुलमुखत्यारपत्र/नोटरी मुखत्यारपत्र (Power of Attorney) अस्तित्वात आणलेले असल्याने सदर रजिस्टर अथवा नोटरी कुलमुखत्यारपत्र /नोटरी मुग्खत्यारपत्राम (Power of Attorney) आमचे आशिलांची कोणतीही मान्यता केंव्हाही नव्हती व नाही. तसेच सदरचे मुखत्यारपत्र हे पुर्णपणे बनावट असुन फसवणुक करून वेकायदेशिर मार्गाने मिळविलेले आहे. त्यामुळे आजपासुन सदर मुखत्यारपत्र पुर्णपणे रद्द (Cancle) व निरस्त (Revoked) समजण्यात यावे.

सदर मुखत्यारपत्राचा गैरवापर होवु नये म्हणुन सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. या नोटीसनंतर श्री. सचिन संपत शेळके यांना आमचे आशिलांचे नावाने कोणताही व्यवहार करण्याचा, कोणत्याही शासकीय, निमशासकीय कार्यालयात आमचे आशिलांचे प्रतिनिधी/कुलमुखत्यार म्हणुन कोणताही व्यवहार करण्याचा, सही करण्याचा किंवा प्रतिनिधित्व करण्याचा कोणताही कायदेशिर अधिकार गहणार नाही. तसेच आमचे आशिलांचे परवानगीशिवाय केलेले सर्व व्यवहार वेकायदेशिर व अमान्य समजले जातील आणि त्यांची कोणतीही जवाबदारी आमचे आशिलांवर राहणार नाही.

तरी सर्व लोकांस अशी समज देण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींच्या संदर्भात तसेच श्री. सचिन संपत शेळके यांनी आमचे आशिलांची वनावट सही करून व फसवणुक करून अस्तित्वात आणलेल्या रजिस्टर अथवा नोटरी कुलमुखत्यारपत्र / नोटरी मुखत्यारपत्र (Power of Attorney) चे आधारे त्यांचेबरोवर कोणीही खरेदी-विकी, दान, गहान, लिज, वक्षिम, अगर अन्य कुठल्याही प्रकारे तवदिलीचा व्यवहार करू नये. कुणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन आगावु सदरची नोटीस प्रसिद्धिस दिली असे.

**परिशिष्ट**

अ. मिळकतींचे वर्णन तुकडी पुणे पो. तु. ना. गावं येथील मे दुय्यम निबंधक सो नारायणगावं यांचे हद्दीतील तसेच जिल्हा परिषद पुणे पंचायत समिती जुन्नरचे हद्दीतील ग्रामपंचायत हिवरे बुद्रुकचे हददीतील मिळकती.

| अ. न. | ग.न. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| १. | ८१८ | ०.४२ | ०.७५ |
| | | पो.ख. ०.०४ | |

येणेप्रमाणे मिळकती व त्यातील झाडझरोडा, लाकुडफाटा, माती, दगड धोंडा, जलतरंग वस्तुसहीत तसेच सदर मिळकतींमध्ये सर्व प्रकारचे वहीवाटीचे हक्क, जाण्यायेण्याचे हक्क व अधिकारासहीत तसेच कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता दरोवस्त.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दिनांक : २३.०४.२०२६
लक्ष्मण रामभाऊ पवार

मनोबल राजेश चासकर (ॲडव्होकेट)
रा. गोकुळधाम सोसायटी नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे.
मो. नं. ७२१९०७७२२९

## एस. बी. पाटील स्कूल सीबीएसई दहावीचा शंभर टक्के निकाल

पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा सीबीएसई इयत्ता दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला आहे. यामध्ये निरंजन अनुसे याला ९८.४ टक्के गुण मिळाले असून त्याने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक आरना झांजे आणि खुशी कटारिया ९८ टक्के, तृतीय क्रमांक श्रीजीत राठोड आणि वेदांत मडोली ९७.८ टक्के, चौथा क्रमांक अंकूर हरल आणि आर्या देवशटवार ९७.६ टक्के तर पाचवा क्रमांक सिद्धी जाधव आणि सुधन्वा कुलकर्णी यांनी ९७.४ टक्के गुण मिळवले. एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या एकूण २७९ विद्यार्थ्यांपैकी १८८ विद्यार्थ्यांना ९१ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत.



## ई-निविदा सूचना

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय पुणे अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय/उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची/नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T-001/2026-27 ते T-006/2026-27 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp) दि. २५.०४.२०२६ ते ०४.०५.२०२६ पर्यंत सकाळी १३.०० वाजे पर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. ०४.०५.२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. ०४.०५.२०२६ रोजी १५.३० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदासंदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था) विभाग पुणे भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६७८२४ वर संपर्क साधावा. निमस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धी पत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcements" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

PRO No. PRO/PZ/031/2026-27

स्वा/–
कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, पुणे.

## कार्यकारी अभियंता

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, अण्णासाहेब मगर बिल्डींग,
पहिला मजला, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७

ई-मेल mh-pun@nic.in
☎ 020-24260501

### निविदा सुचना क्रमांक ०१ / २०२६-२०२७ (द्वितीय मागणी)

मा. जिल्हाधिकारी, यांनी निर्देश दिल्यानुसार पुणे जिल्ह्याकरीता मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेसाठी लागणाऱ्या यंत्र सामुग्री व पाईप पुरवठा दर तसेच कंत्राटदारांचे Empanelment निश्चित करणेस्तव कंत्राटदारांकडून विधानसभाक्षेत्र निहाय दोन वर्षासाठी ई-दरपत्रक मागविणेसाठी निविदा सूचना क्र. ०१ / २०२६-२७ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २७/०४/२०२६ सकाळी ११.०० पासून प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सही/-
(स. स. नगरारे)
कार्यकारी अभियंता
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पुणे

*क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C417*

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्वामी नलिनानंद गिरी महाराजांच्या पथकास विश्वस्त व पोलिसांनी रोखले

पुणे (दैनिक संध्या) : मंचर दि.24 (प्रतिनिधी) : जंगलवासी श्रीक्षेत्र भीमाशंकर मंदिर दुरुस्तीमुळे बंद असल्याची माहिती असतानाही अमेरिकेतून आलेल्या स्वामी नलिनानंद गिरी महाराजांनी दर्शनासाठी दबाव टाकत उद्धट भाषा वापरल्याचा प्रकार उघड झाला. मात्र पोलिसांनी नियमांनुसार त्यांना पुढे जाण्यास रोखले. स्वामी हे अमेरिकेतील 'इटर्नल व्हॉईस' संस्थेचे अध्यक्ष असून त्यांच्या सोबत सुमारे २० अमेरिकन, ३० भारतीय नागरिक १५ वाहनांतून आले होते. सध्या मंदिरासमोरील सभामंडप व पायरी मार्गाच्या कामांमुळे तीन महिन्यांपासून प्रशासनाकडून मंदिर भाविकांसाठी बंद आहे. तरीही स्वामींनी मोठ्या आवाजात दबाव टाकत मंदिराकडे जाण्याचा प्रयत्न केला. पोलिस हवालदार सुरेश काटे यांनी नम्रपणे समजावून सांगत नियमांची अंमलबजावणी केली आणि पथकाला पुढे जाण्यापासून रोखले. यावेळी स्वामी व त्यांच्या सहकाऱ्यांकडून "आमच्या मोठ्या ओळखी आहेत, परिणाम भोगावे लागतील," अशी भाषा वापरली तरी पोलिसांनी कर्तव्य बजावले. देवस्थानचे उपकार्यकारी विश्वस्त मधुकर शास्त्री गवांदे म्हणाले, मंदिर बंद असल्याची माहिती देऊनही परवानगी न घेता येणे आणि प्रशासनावर टीका करणे चुकीचे आहे. स्वामींना कोणतीही अधिकृत परवानगी नव्हती. लेखी परवानगीशिवाय प्रवेश देता येणार नाही, असे पूर्वीच स्पष्ट करण्यात आले होते, असे अध्यक्ष सुरेश कौदरे म्हणाले. परवानगी नसताना येऊन दबाव टाकणे व भीमाशंकरची बदनामी करणे योग्य नाही. संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी सरपंच दत्तात्रय हिले यांनी केली आहे. परदेशातून आले असले तरी नियमांचे पालन आवश्यक आहे. एवढ्या मोठ्या संख्येने येऊन गोंधळ घालणे योग्य नाही, असे उपकार्यकारी विश्वस्त मधुकर शास्त्री गवांदे यांनी स्पष्ट केले. गेले अनेक महिने प्रशासनाने भीमाशंकर मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद केले आहे असे सांगितले गेले आहे तरी देखील भाविक दर्शनासाठी येत आहेत त्यामुळे असे प्रकार मंदिर परिसरात घडत आहेत.

### बारामती येथील गोदामामध्ये ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रे ताळेबंद- उत्तम दिघे

पुणे (दैनिक संध्या) : बारामती विधानसभा मतदारसंघाची पोटनिवडणूकीत २३ एप्रिल २०२६ रोजी ४७८ मतदान केंद्रांवर मतदानासाठी वापरण्यात आलेले ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम, एमआयडीसी, बारामती येथे निवडणूक निरीक्षक, उमेदवार तसेच उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत छायाचित्रणासह सुरक्षितपणे ताळेबंद करण्यात आले आहेत, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली आहे. भारत निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या साठवण व सुरक्षा प्रोटोकॉलनुसार स्ट्राँग रूमसाठी दुहेरी स्तराची सशस्त्र सुरक्षा तसेच २४x७ सीसीटीव्ही देखरेखीची व्यवस्था करण्यात आली आहे. राखीव ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रेदेखील त्याच ठिकाणी स्वतंत्र राखीव स्ट्राँग रूममध्ये निर्धारित सुरक्षा नियमांनुसार साठवण्यात आली आहेत. सर्व उमेदवारांना त्यांच्या प्रतिनिधींना स्ट्राँग रूमच्या सुरक्षा व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त करण्याबाबत लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, त्यांना अंतर्गत सुरक्षा परिघाच्या बाहेर थांबण्याची परवानगी देण्यात आली आहे. यासाठी संबंधित ठिकाणी सीसीटीव्ही प्रदर्शनाची व आवश्यक सुरक्षा व्यवस्थेची सोय करण्यात आली आहे. या निवडणूकीत एकूण ५८.१७ टक्के मतदान झालेअसून मतमोजणी ४ मे रोजी सकाळी ८ वाजता वाजता सुरु होणार आहे. यावेळी निवडणूक निरीक्षक, उमेदवार तसेच उमेदवारांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत स्ट्राँग रूम उघडण्यात येणार आहे, अशी माहिती श्री दिघे यांनी दिली आहे.




### गुणवत्ता संवर्धन अभियानात सुरेशभाऊ गोरे विद्यालयाचे यश

चाकण (दैनिक संध्या) : पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ व पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियान २०२५ - २६ या गुणवत्ता संवर्धन अभियानामध्ये येथील स्व.आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने द्वितीय क्रमांक मिळवून घवघवीत यश संपादन केले. येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण समारंभात शिक्षण संचालक महेश पालकर, उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, मुख्याध्यापक संघाचे राज्य सचिव नंदकुमार सागर, जिल्हाध्यक्ष प्रसाद गायकवाड आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राचार्या प्रमिला गोरे, प्रा. सचिन आभाळे, सहशिक्षक दत्तात्रय लिंभोरे, अर्जुन बारगजे, नितीन शिंदे आदींनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, राजेश जाधव आदी उपस्थित होते. संस्कारक्षम, उपक्रमशील, दर्जेदार शिक्षण, धार्मिक व अध्यात्मिक ज्ञानाची जोड, कला व क्रीडा क्षेत्रात अग्रस्थानी असणाऱ्या या शाळेच्या यशात सर्व विद्यार्थी शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, पालक, प्रशासन व संस्था पदाधिकारी या सर्वांचा सहभाग आहे. चाकणच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, ओंकार गोरे, माणिक गोरे आदींनी गुणवंत शिक्षकांचे कौतुक केले.

# भिमा पाटसच्या प्रशासक नियुक्तीला सहकार मंत्र्यांची स्थगिती

## संचालक मंडळ जैसे थे - संचालक तुकाराम ताकवणे यांची माहिती

**यवत (दै. संध्या)**

सहकार विभागात मोठी खळबळ उडवणारी घटना समोर आली असून, प्रादेशिक सहसंचालक (साखर) नीलिमा गायकवाड यांनी दिलेल्या आदेशाला थेट सहकार मंत्र्यांनी स्थगिती दिली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० अंतर्गत पारित करण्यात आलेल्या या आदेशाविरोधात भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुकाराम भिकोबा ताकवणे यांनी मंत्रालयात धाव घेतली होती.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तातडीने आदेशाला स्थगिती दिल्याने प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे विभागाच्या प्रादेशिक संयुक्त संचालक (साखर) यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी संबंधित प्रकरणावर आदेश दिला होता. या आदेशामुळे भीमा सहकारी साखर कारखाना, पाटस येथील प्रशासकीय कामकाजात मोठे बदल अपेक्षित होते.


मात्र, हा निर्णय एकतर्फी असून नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप संचालक तुकाराम ताकवणे (रा. पारगाव) यांनी केला आहे.

याविरोधात त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम १५२ व १५४ अंतर्गत 'रिव्हिजन अप्लिकेशन' (पुनर्विचार अर्ज) दाखल करत थेट मंत्रालयाचे दार ठोठावले.

या प्रकरणात प्रादेशिक संयुक्त संचालक यांच्यासह नियुक्त प्रशासकीय समितीचे अध्यक्ष आणि सदस्य यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

सहसंचालकांनी आदेश देताना नैसर्गिक न्यायदानाचा भंग केला का, तसेच नियुक्त समितीच्या निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता होती का, असे महत्त्वाचे प्रश्न अर्जाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आले आहेत.

सहकार क्षेत्रातील राजकीय आणि प्रशासकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, मंत्र्यांनी दिलेल्या स्थगितीनंतर या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# बेलसर टोलनाक्यावर स्थानिकांना टोलमाफी मिळावी

## युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पवार यांची मागणी; 'एनएचएआय'ला निवेदन सादर

**जेजुरी (दै. संध्या)**

जेजुरी जवळील (ता. पुरंदर) बेलसर टोलनाक्यावर पुरंदर तालुक्यातील स्थानिक नागरिकांना टोलमाफी मिळावी, अशी मागणी पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष उमेश प्रमोद पवार यांनी केली. या मागणीचे निवेदन भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे (एनएचएआय) महासंचालक संजय कदम यांच्याकडे देण्यात आले. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष लहुअण्णा निवंगुणे, पुरंदर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष साहेबराव फडतरे, प्रदेश युवक सचिव विश्वजीत जाधव, जिल्हा युवक उपाध्यक्ष सुरज कारदगे, जिल्हा युवक सरचिटणीस सुजित शिंदे यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी व



कार्यकर्ते उपस्थित होते.

उमेश पवार म्हणाले, "पुरंदर तालुक्यातील जनतेवर अन्यायकारक पद्धतीने टोलचा बोजा टाकला जात असून, स्थानिक नागरिकांकडून वारंवार टोल वसुली केली जात आहे. स्थानिक नागरिकांना कोणतीही सवलत न देता त्यांची आर्थिक लूट सुरू आहे. हा प्रकार तात्काळ बंद करून स्थानिकांना संपूर्ण टोल माफी देण्यात यावी, अशी युवक काँग्रेसची ठाम भूमिका आहे. जर प्रशासनाने ही मागणी तात्काळ मान्य केली नाही, तर युवक काँग्रेसच्या माध्यमातून तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल. टोल नाक्यावर रास्ता रोको, ठिय्या आंदोलन, मोर्चा तसेच लोकशाही मार्गाने मोठा लढा उभारला जाईल."

तसेच सासवडमध्ये जाणारा व सासवडमधून बाहेर पडणाऱ्या दोन्ही प्रमुख मार्गांवर वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत असल्याने त्या ठिकाणी पूल (ओव्हरब्रिज) उभारण्यात यावेत. सुकलवाडी व वागदरवाडी फाटा येथेही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक सुरळीत होण्यासाठी तात्काळ ब्रिज बांधण्यात यावा आणि जेजुरी येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना वाहतूक कोंडी व गैरसोयीचा त्रास होत असल्याने, जेजुरी ओव्हरब्रिज तातडीने उभारण्यात यावा, या मागण्या युवक काँग्रेसच्या माध्यमातून करण्यात आल्या. या सर्व मागण्यांबाबत अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, शंभर टक्के तुमच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करू, असे आश्वासन दिले."

## पिंपळवंडीत सार्वजनिक कामात राजकीय हस्तक्षेप:अतुल बेनके

**नारायणगाव (दै. संध्या)**

पिंपळवंडी गावात नव्याने उभारण्यात आलेल्या प्रवेशद्वाराचे बुधवारी (दि. २२) लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत माजी आमदार अतुल बेनके यांचे नाव समाविष्ट करण्यास जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी विरोध केल्याचे ग्रामस्थांकडून समजल्याचे बेनके यांनी सांगितले. त्यामुळे पिंपळवंडी गावातील सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोप करत माजी आमदार अतुल बेनके यांनी पुढील काळात पिंपळवंडी येथील सार्वजनिक कार्यक्रमाला उपस्थित राहणार नसल्याचा इशारा दिला आहे. स्वर्गीय वल्लभ बेनके यांच्या नावाला जाणीवपूर्वक विरोध होत असल्याचा आरोपही केला आहे.



मळगंगा माता नवरात्र उत्सव मंडळाने हाती घेतलेल्या प्रवेशद्वार निर्मितीसाठी गावातील सबाजी लेंडे, शरद लेंडे व रघुनाथ लेंडे यांनी मदतीचे आवाहन केले होते. त्यानुसार बेनके कुटुंबाने १ लाख १ हजार रुपयांची आर्थिक मदत केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र ,या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत माजी आमदार अतुल बेनके यांचे नाव समाविष्ट करण्यास जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी विरोध केल्याचे ग्रामस्थांकडून मिळाल्याचा दावा अतुल बेनके यांनी केला आहे .

## माथाडी कामगार संघटनेच्या अध्यक्षपदी उषा कोपुलवार

**वाल्हे (दै. संध्या)**

राष्ट्रवादी माथाडी व जनरल कामगार युनियनच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्षपदी उषा श्रीकांत कोपुलवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.यावेळी संघटनेचे अध्यक्ष उमेश पाटील यांनी पत्राद्वारे सदरची निवड जाहीर केली असून या निवडीमुळे कामगार चळवळीला नव्याने बळ मिळणार असल्याची भावना सर्वसामान्य वर्गामधून व्यक्त केली जात आहे.

पिंपरी चिंचवड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून उषा कोपुलवार यांनी सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रात देखील आपल्या नावाचा आगळा वेगळा ठसा उमटविला होता. त्यांच्या कार्याची दखल घेऊनच राष्ट्रवादी माथाडी व जनरल कामगार युनियनच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांना देण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष उमेश पाटील तसेच कार्याध्यक्ष महेश पाटील व सरचिटणीस प्रसाद तनपुरे यांनी दिली.



तर या निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते मनोज साळवे राकेश वाघमारे अतुल चव्हाण रवी शिंगे गणेश गायकवाड विजय राठोड राजन नायर स्वाती शिंगे आरपीआयचे अध्यक्ष शैलेंद्र भोसले यांसह विविध सामाजिक संघटनेच्या वतीने उषा कोपुलवार यांचा विशेष सत्कार देखील करण्यात आला.

या दरम्यान सत्काराला प्रतिउत्तर देताना उषा कोपुलवार म्हणाल्या संघटनेकडून दिलेल्या जबाबदारीतून कामगारांचे प्रतिनिधित्व करण्याबरोबरच त्यांच्या न्याय हक्कासाठी वेळप्रसंगी लढा देखील उभारणार आहे.




## आळंदीतील श्री ज्ञानेश्वर विद्यालयाचा तालुक्यात मानाचा तुरा

**आळंदी (दै. संध्या)**

खेड तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, आळंदी देवाची या प्रशालेला सन २०२५ - २६ मधील तालुकास्तरीय गुणवत्ता संवर्धन अभियानात प्रथम क्रमांक मिळाला आहे. या यशामुळे परिसरात संस्थेचे कौतुक होत आहे. पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या अभियानात इयत्ता पाचवी ते बारावी गट 'अ' मध्ये खेड तालुक्यातील सर्व शाळांची तपासणी करून ही निवड करण्यात आली.

पुरस्कार वितरण सोहळा गुरुवारी (दि.२३) गणेश कला क्रीडा मंच येथे उत्साहात पार पडला. यावेळी महेश पालकर, डॉ.गणपत मोरे, डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

संस्कारक्षम, उपक्रमशील आणि दर्जेदार शिक्षणाबरोबरच धार्मिक व अध्यात्मिक मूल्यांची जोड देत कला व क्रीडा क्षेत्रातही आघाडीवर असलेल्या या शाळेच्या यशात विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, प्रशासन आणि संस्था पदाधिकाऱ्यांचे संयुक्त योगदान असल्याचे अधोरेखित करण्यात आले. या पुरस्काराचे स्वीकृत संस्थेचे सचिव अजित वडगावकर, प्राचार्य किसन राठोड, पर्यवेक्षिका अनिता गावडे तसेच संजय उदमले, विकास शिवले, अल्लाबक्ष मुलानी, गोविंद निळे यांनी केले.

# सत्कारासाठी पुष्पगुच्छाऐवजी झाडाचे रोप द्यावे

## शशिकांत कांबळे यांची मागणी; पद्मा फाउंडेशनतर्फे महापौर, महापालिका आयुक्तांना निवेदन

**पुणे (दै. संध्या)**

विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये सत्कारासाठी दिल्या जाणाऱ्या पुष्पगुच्छांऐवजी झाडांचे रोप देण्याची प्रथा सुरू करावी, अशी मागणी पद्मा फाउंडेशनतर्फे करण्यात आली आहे. यासंदर्भात फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांनी महापौर मंजुषा नागपूरे, तसेच पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना निवेदन दिले. प्रसंगी विरोधी पक्षनेते अँड निलेश निकम, युवा उद्योजक निखिल तांबट व श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेचे





काळूभाऊ चव्हाण उपस्थित होते.

शशिकांत कांबळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या विविध कार्यक्रमांमध्ये पुष्पगुच्छ देण्याची प्रथा मोठ्या प्रमाणावर रूढ झाली आहे. मात्र, हे पुष्पगुच्छ बहुधा प्लास्टिकमध्ये पॅक केलेले असतात आणि काही वेळातच टाकून दिले जातात. त्यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत असून, प्लास्टिक कचऱ्याची समस्या अधिक तीव्र होत आहे. या पार्श्वभूमीवर, पुष्पगुच्छांच्या ऐवजी झाडांचे रोप देण्याची पद्धत अवलंबल्यास पर्यावरण संवर्धनाला चालना मिळेल. 'स्वच्छ, सुंदर व हरित पुणे' या संकल्पनेलाही बळकटी मिळेल."

महापालिकेच्या वतीने आयोजित होणाऱ्या सर्व कार्यक्रमांमध्ये ही संकल्पना राबविण्याचा पुढाकार घ्यावा, अशी विनंती करण्यात आली आहे. गरजू नागरिकांना आणि स्थानिकांना रोपांचे वितरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करता येईल का, याबाबतही विचार करावा. पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा प्रकारचे निर्णय महत्त्वाचे ठरतील. त्यामुळे प्रशासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा कांबळे यांनी व्यक्त केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### शितल खरटमल यांना नीती आयोगाचा "भारत विभूषण" राष्ट्रीय पुरस्कार

भिवंडी (दैनिक संध्या) : नीती आयोगातर्फे उदयपूर येथे सुमो रेसलिंग-स्पर्धेमध्ये डबल एशियन मेडल प्राप्त करणाऱ्या ठाणे ग्रामीण पोलीस विभागातील खेळाडू,ठाणे जिल्ह्याच्या व महाराष्ट्रातील एकमेव महिला आंतरराष्ट्रीय खेळाडू शितल मल्लिकार्जुन खरटमल यांना उदयपूर येथे "भारत विभुषण" या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले सदर प्रसंगी राजस्थान विधान परिषदेचे व्हॉइस सेक्रेटरी सारंगदेवोत, इंडियन आर्मी लेफ्टनंट जनरल एन.के. सिंग, ग्लोबल प्रेस्टेज नारायण सेवा संस्थाचे अध्यक्ष प्रशांत अग्रवाल हस्ते नुकताच सन्मानित करण्यात आले. पोलीस विभागातील शितल सारख्या गुणी खेळाडू मिळविलेल्या या पुरस्कारा बद्दल संजय दराडे (आईजी कोकण परिक्षेत्र,नवी मुंबई) यांनी तिने मिळवलेल्या या यशाबद्दल व स्पर्धेतील नेत्रदीपक कामगिरी केल्याबद्दल पोलीस विभागाचे नाव भविष्यातही उज्वल करण्यासंबंधी शुभेच्छा व्यक्त करत तिचा यातच विभागाच्या वतीने सन्मान करण्यात आला. शितल खरटमल यांच्या क्रीडा क्षेत्रातील यश संपादनाने ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के,रवींद्र पाठक, सुधीर कोकाटे (नगरसेवक) इत्यादी मान्यवरांनी तिचा सन्मान करीत भविष्यातील क्रीडा क्षेत्रातील कारकिर्दीस शुभेच्छा दिल्या.

### लोकशाहीचा 'पाचवा स्तंभ' म्हणून जनसंपर्क प्रभावी; पीआरएसआय मुंबई चॅप्टरचा उपक्रम

मुंबई (दैनिक संध्या) : आजच्या माहितीच्या युगात जनसंपर्क हा केवळ कॉर्पोरेट संदेशांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो लोकशाहीला बळकटी देणारा 'पाचवा स्तंभ' ठरत आहे, असा सूर पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया (पीआरएसआय) मुंबई चॅप्टरने आयोजित केलेल्या कार्यक्रमात उमटला. राष्ट्रीय जनसंपर्क दिनाच्या निमित्ताने आयोजित या विशेष कार्यक्रमात लोकशाही व्यवस्थेत नैतिक संवादाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. युवा संवाद आणि मार्गदर्शन या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय जनसंपर्क क्षेत्रात तरुण पिढीचा आवाज बळकट करणे हे होते. यावेळी जनसंपर्क क्षेत्रातील दिग्गज, शिक्षणतज्ज्ञ आणि भावी संवादकांनी एकत्र येऊन चर्चा केली. संस्था आणि नागरिक यांच्यातील पारदर्शकता, विश्वास आणि उत्तरदायित्व वाढवण्यासाठी जनसंपर्काची भूमिका कशी महत्त्वाची आहे, यावर वक्त्यांनी प्रकाश टाकला. विश्वासार्हतेची भूमिका कार्यक्रमात समूह चर्चेमध्ये 'साम टी.व्ही.'चे मुख्य संपादक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश खरे आणि डॉ. संजय रानडे यांनी सहभाग घेतला. "फेक न्यूजच्या युगात जनसंपर्क व्यावसायिकांनी सत्याचे आणि विश्वासार्हतेचे रक्षक म्हणून काम करणे आवश्यक आहे. लोकशाही प्रक्रियेत जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी ही भूमिका महत्त्वाची आहे," असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी जय हिंद कॉलेज, देवीप्रसाद गोएंका मॅनेजमेंट कॉलेज ऑफ मीडिया स्टडीज आणि मुंबई विद्यापीठाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खुल्या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी कार्यक्रमात रंगत आणली. जय हिंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या संगीत सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी एफपीजे ग्रुपचे संचालक श्री. अभिषेक कर्नानी यांचीही प्रमुख उपस्थिती होती. मुंबई चॅप्टरच्या अध्यक्षा श्रीमती अनिता श्रीवास्तव यांनी भविष्यातील संवादकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "लोकशाहीच्या भरभराटीसाठी केवळ तरुण आवाज ऐकणे पुरेसे नाही, तर त्यांना सचोटीने नेतृत्व करण्यासाठी सक्षम करणेही तितकेच महत्त्वाचे आहे." याप्रसंगी पीआरएसआय मुंबई चॅप्टरचे सचिव डॉ. मिलिंद आवताडे, सहसचिव प्रा. दैवता पाटील, कोषाध्यक्ष अमलन मस्कारेन्हास, जेनेट अरोले, ब्रज किशोर, सुहास नाईक आणि उपाध्यक्ष राजेश परिदा उपस्थित होते.

# ग्रोथ हब प्रकल्पांचा वित्त आयोगाचे डॉ. करीर यांच्याकडून आढावा

पुणे (दै. संध्या)



पुणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास आराखडा तयार करण्याच्या अनुषंगाने पुणे ग्रोथ हब अंतर्गत कार्यकारी समितीची बैठक राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. नितीन करीर यांच्या अध्यक्षतेखाली मेट्रो भवन, शिवाजीनगर येथे संपन्न झाली. पुणे ग्रोथ हब आराखडा जिल्ह्याच्या शाश्वत व गतिमान विकासासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास डॉ. करीर यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएच्या अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड, उपवनसंरक्षक महादेव मोहिते, मध्य रेल्वेचे मुख्य अभियंता गौतम कुमार, कृष्णा खोरे महामंडळाचे कार्यकारी संचालक हनुमंत धुमाळ, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अभिजीत आवटे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रादेशिक अधिकारी श्रीमती अर्चना पठारे, अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, आयएसईजीचे संचालक शिरीष संखे उपस्थित होते.

डॉ. करीर यांनी यावेळी पुणे परिसरातील आर्थिक वाढ, जीवनमानाची गुणवत्ता व शाश्वत विकास या प्रमुख तत्त्वांवर आधारित पायाभूत सुविधा, उद्योग, वाहतूक, पर्यटन, कृषी व शहरी विकास आदी विविध क्षेत्रांतील प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेतला. संबंधित विभागांकडून लघुकालीन व दीर्घकालीन विकास योजना, गुंतवणूक प्रस्ताव व आवश्यक सूचनांचा अभ्यास तसेच विविध विभागांच्या समन्वयाने एकात्मिक विकास आराखडा तयार करण्याच्यादृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीत पुणे ग्रोथ हब या संकल्पनेअंतर्गत पुणे जिल्ह्याच्या आर्थिक व पायाभूत विकासासाठी दीर्घकालीन आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले. बैठकीला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागांचे वरिष्ठ अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतील अर्ज त्रुटी दुरुस्तीसाठी ३० पर्यंत मुदत

पुणे (दै. संध्या)

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जांमध्ये आढळलेल्या त्रुटी दुरुस्त करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत अंतिम संधी देण्यात आली आहे. सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडून त्रुटी असलेले अर्ज 'sent back' करून विद्यार्थ्यांना आवश्यक सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून दिली जात आहे.

मात्र, दिलेल्या अंतिम मुदतीपर्यंत अर्जातील त्रुटींची पूर्तता न केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचे अर्ज कायमस्वरूपी नाकारले जाणार असून, त्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही समाज कल्याण विभागामार्फत केली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यामुळे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी ३० एप्रिल २०२६ पूर्वी आपल्या अर्जातील त्रुटी तात्काळ दुरुस्त करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन समाज कल्याण अधिकारी, माधुरी वाघमोडे यांनी केले आहे.

## मॅक्स लाइफ ने टियर २ आणि ३ बाजारपेठांमध्ये 'भरोसे का अ‍ॅड्रेस' कार्यालयांचे उद्‌घाटन

पुणे (दै. संध्या)

AXIS MAX LIFE INSURANCE

ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लिमिटेडने जी पूर्वाश्रमीची मॅक्स लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड आहे तिने विशेषतः उत्तर प्रदेश, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि आसाम अशा विविध ठिकाणी टियर २ आणि टियर ३ बाजारपेठांमध्ये ५० नवीन एजन्सी कार्यालये उघडून आपल्या वितरण जाळ्याचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे.

हा उपक्रम आयआरडीएआयच्या '२०४७ पर्यंत सर्वांसाठी विमा' मोहिमेसाठी प्रोत्साहक असून त्यामुळे जीवनविमा फक्त गुंतवणुकीची गोष्ट न ठरता मुख्य गरज असल्याचे स्पष्ट होते. भारताच्या उदयोन्मुख आर्थिक रचनांमध्ये आपल्या एजन्सी नेटवर्कचा विस्तार करताना ॲक्सिस मॅक्स लाइफचे उद्दिष्ट संरक्षणातील अंतर कमी करणे आणि आर्थिक समावेशकतेला चालना देणे तसेच अगदी दुर्गम भागांपर्यंत पोहोचण्याचे आहे.

ॲक्सिस मॅक्स लाइफचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले, "आर्थिक संरक्षण भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचावे यासाठी आमची बांधिलकी आहे. आमच्या ५० कार्यालयांची भर पडल्याने उदयोन्मुख भारताच्या संरक्षणविषयक गरजांना थेट प्रतिसाद देण्यासाठी टियर २ आणि टियर ३ बाजारपेठांवर आमचे लक्ष केंद्रित झाल्याचे दिसून येते.

विमा संरक्षणाच्या पलीकडे जाऊन 'भरोसे का अ‍ॅड्रेस' कार्यालये स्थानिक समुदायांसाठी रोजगाराच्या महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून देतील. प्रत्येक शाखेला संरचित भरती आणि सक्षमीकरण कार्यक्रमाद्वारे पाठबळ दिले जाईल, नवीन सल्लागारांना डिजिटल साधने आणि संबंधित आर्थिक सल्ला देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल. हा स्थानिक दृष्टीकोन या गोष्टीची खात्री करतो की आर्थिक सल्ल्यात स्थानिक परंपरांचे प्रतिबिंब पडेल आणि देशभरातील कुटुंबांच्या आर्थिक प्रवासात अखंडपणे सहभागी होईल.

हे उद्घाटन हा वित्तीय वर्ष २६ चा महत्त्वाचा टप्पा असला तरी, 'भरोसे का अ‍ॅड्रेस' भारताच्या संरक्षण परिसंस्थेसाठी दीर्घकालीन वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हा विस्तार सातत्यपूर्ण, उच्च दर्जाचे संरक्षण उपाय वितरीत करण्यास सक्षम असलेल्या भविष्यासाठी सज्ज एजन्सी नेटवर्कला आधार देण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा म्हणून काम करेल.

# जागतिक मलेरिया दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणेचा जनजागृतीवर भर

## मलेरिया प्रतिबंध, लवकर निदान आणि वेळेवर उपचार याबाबत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

पुणे (दै. संध्या)



पुणे यांनी जागतिक मलेरिया दिनानिमित्त मलेरियाबाबत जनजागृती वाढवण्याचा ठाम संकल्प व्यक्त केला आहे. मलेरिया हा आजही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर प्रश्न असून, विशेषतः ज्या भागात डासांची उत्पत्ती वाढीस लागते अशा ठिकाणी त्याचा धोका अधिक असतो. हा आजार टाळता आणि बरा करता येण्यासारखा असला तरी जागरूकतेचा अभाव आणि उपचारात होणारा विलंब यामुळे अनेकांना त्याचा फटका बसत आहे.

मलेरिया हा संसर्गजन्य आजार असून तो संक्रमित मादी अ‍ॅनोफिलीस डासांच्या चाव्यामुळे पसरतो. ताप, थंडी वाजणे, डोकेदुखी, घाम येणे आणि अशक्तपणा ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी उपचार न घेतल्यास हा आजार गंभीर रूप धारण करून शरीरातील महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम करू शकतो.

या निमित्ताने Dr. Rizwan Malik, पब्लिक हेल्थ स्पेशालिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी सांगितले, "मलेरिया हा पूर्णपणे टाळता आणि बरा करता येणारा आजार आहे. मात्र जागरूकतेचा अभाव आणि उपचारात होणारा विलंब यामुळे तो अजूनही धोकादायक ठरत आहे. लवकर निदान आणि योग्य वेळी वैद्यकीय उपचार घेतल्यास जीव वाचू शकतो. डासजाळ्यांचा वापर, स्वच्छता राखणे आणि साचलेले पाणी टाळणे यासारख्या सोप्या उपायांनी मोठा फरक पडू शकतो. मलेरियाच्या निर्मूलनासाठी समुदायाचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे."मेडिकव्हर हॉस्पिटल्सने नागरिकांना पुढील प्रतिबंधात्मक उपाय अवलंबण्याचे आवाहन केले आहे:

* घराभोवती आणि कार्यस्थळी पाणी साचू देऊ नये
* रात्रीच्या वेळी डासप्रतिबंधक उपाय आणि कीटकनाशक जाळ्यांचा वापर करावा
* स्वच्छता आणि स्वच्छ परिसर राखावा
* ताप किंवा फ्लूसारखी लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा
* डॉक्टरांनी दिलेला उपचार पूर्णपणे घ्यावा

Medicover Hospitals, पुणे हे रुग्ण शिक्षण, लवकर निदान आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देत राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर मलेरिया नियंत्रणाच्या प्रयत्नांना सतत पाठिंबा देत आहे. या जागतिक मलेरिया दिनानिमित्त रुग्णालयाने नागरिकांना सतर्क राहून प्रतिबंधात्मक उपाय अवलंबण्याचे आणि मलेरियामुक्त भविष्यासाठी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले आहे.

# शंभर टक्के फी माफीमुळे मुलींच्या तंत्रशिक्षणाला गती

## कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, डाटा सायन्स आदी अनेक क्षेत्रांमध्ये मुलींसाठी रोजगाराच्या संधी

मुंबई (दै. संध्या)




'लेक शिकली, प्रगती झाली' ही केवळ एक म्हण नाही, तर आजच्या बदलत्या समाजाचा मार्गदर्शक विचार बनली आहे. महिलांचे शिक्षण हे केवळ त्यांच्या वैयक्तिक प्रगतीपुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. शिक्षित महिला म्हणजे सक्षम कुटुंब, जागरूक समाज आणि प्रगत राष्ट्र ही जाणीव लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) अभ्यासक्रमामध्ये मुलींसाठी शंभर टक्के शुल्क माफीची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. हा निर्णय राज्यातील हजारो कुटुंबांसाठी दिलासा देणारा आणि मुलींच्या शिक्षणाला नवी दिशा देणारा ठरत आहे.

तंत्रशिक्षण हे रोजगारक्षम शिक्षण मानले जाते. इंजिनिअरिंग डिप्लोमा अभ्यासक्रमामुळे मुलींना कमी कालावधीत तांत्रिक कौशल्ये आत्मसात करता येतात. प्रयोगशाळा, कार्यशाळा आणि प्रत्यक्ष प्रशिक्षणाच्या (प्रॅक्टिकल) माध्यमातून त्यांना कामाचा अनुभव मिळतो. त्यामुळे त्या केवळ सैद्धांतिक ज्ञानावर अवलंबून राहत नाहीत, तर उद्योग क्षेत्रात काम करण्यासाठी तयार होतात.

आज उत्पादन उद्योग, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र, इलेक्ट्रॉनिक्स, स्थापत्य, ऑटोमोबाईल आणि आता नव्या युगामध्ये संगणक अभियांत्रिकीसोबतच इतर कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, डाटा सायन्स आदी अनेक क्षेत्रांमध्ये मुलींसाठी रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. तंत्रशिक्षणामुळे त्या आत्मनिर्भर बनतात आणि स्वतःच्या पायावर उभ्या राहण्याची क्षमता विकसित करतात. एक आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र महिला कुटुंबाचा, समाजाचा आणि देशाचा आधारस्तंभ बनते.

अनेक कुटुंबांमध्ये आजही आर्थिक मर्यादा ही मुलींच्या शिक्षणातील मोठी अडचण ठरते. विशेषतः तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणासाठी लागणारा खर्च अनेकांना परवडत नाही.

त्यामुळे अनेक मुली दहावी किंवा बारावीनंतर शिक्षण थांबवतात. अशा परिस्थितीत ही फी माफी योजना मुलींसाठी एक मोठा आधार ठरते. ज्या कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपर्यंत आहे.

अशा सर्व पात्र मुलींना या योजनेचा लाभ दिला जातो. यामध्ये शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येते. त्यामुळे आर्थिक अडथळ्यांमुळे शिक्षण थांबण्याची वेळ येत नाही.

ही योजना अधिक सुलभ आणि पारदर्शक करण्यासाठी महाडिबीटी (DBT) प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. डिजिटल प्रक्रियेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करता येतो आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण होते.

यामुळे वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होते. विद्यार्थ्यांना कार्यालयीन प्रक्रियेमध्ये अडकून पडावे लागत नाही आणि त्यांना सहजपणे योजनेचा लाभ मिळतो. डिजिटल प्रणालीमुळे शिक्षण क्षेत्र अधिक आधुनिक आणि सोयीस्कर बनले आहे.

या योजनेमुळे मुलींना शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेला आर्थिक आधार सहज उपलब्ध होतो. त्यामुळे केवळ शहरी भागातीलच नव्हे, तर ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलीही तंत्रशिक्षणाकडे मोठ्या प्रमाणावर वळत आहेत.

यामुळे शिक्षणातील असमानता कमी होण्यास मदत होत आहे. प्रत्येक मुलीला तिच्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार शिक्षण घेण्याची समान संधी मिळत आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील एखाद्या छोट्या गावातील मुलगी तंत्रज्ञ होण्याचे स्वप्न पाहू शकते, हे या योजनेमुळे शक्य होत आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा हा उपक्रम महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी बनवणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि समाजात समान संधी उपलब्ध करून देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. शिक्षित आणि आत्मनिर्भर महिला समाजाच्या प्रगतीमध्ये मोठा वाटा उचलतात. त्यामुळे अशा योजनांचा परिणाम केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही.

आजच्या काळात मुली शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि प्रशासन अशा सर्व क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करत आहेत. अशा वेळी आर्थिक अडचणी त्यांच्या प्रगतीत अडथळा ठरू नयेत, यासाठी ही फी माफी योजना अत्यंत महत्त्वाची ठरते. मुलींच्या शिक्षणाला चालना देणारी ही योजना राज्याच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अधिक माहितीसाठी https://msbte.ac.in तसेच https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### खंडुखैरेवाडी व शेरेवाडीतून चोरीस गेलेल्या टॉवर लाईन ॲल्युमिनियमच्या तारांसह आरोपी जेरबंद

पुणे (दैनिक संध्या) : दिनांक 04/02/2026 रोजी 18.00 वाजता ते दिनांक 05/02/2026 रोजी 9.00 वाजनेचे दरम्यान मौजे खंडुखैरेवाडी टॉवर क्रमांक 120/0 ते 124/2 तसेच शेरेवाडी येथील टॉवर क्रमांक 120/5 ते 120/6 मधील ए एल 59 झेब्रा कंडक्टर तार 0.6 कि मीटर प्रति 360 रु. मीटर प्रमाणे तसेच 4.4 कि मीटर प्रति 360 रु.मीटर प्रमाणे असे एकूण17,99,500 /- रु किमतीचा मुद्देमाल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले बाबत सुपा पोलीस स्टेशन ला दिनांक 16/02/2026 ला गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे गुन्हा उघडकीस आणून, गुन्ह्याचे तपास कामी 1) शिवशंकर मारुती हळदेकर वय-23 वर्षे हल्ली रा. मेदनकरवाडी चाकण,ता. खेड,जि.पुणे मुळ रा.इकळीमोर ता.नायगाव,जि.नांदेड 2) मोहन सिंग धनसिंग राजपूत वय-36 वर्षे रा.केसनंद वाघोली,ता.हवेली,जि.पुणे मूळ पत्ता मुपो. कन्होजा तहसील-कुम्बंलगड जि.राजसमन, राज्य-राजस्थान 3) सुरज राजू गिराम उर्फ सुरज डोंगरे वय-21 वर्षे रा.मेदनकरवाडी चाकण,ता.खेड जि.पुणे मूळ रा.फुलारवाडी,पोस्ट वाघाळा, ता.पाथरी,जि.परभणी 4) कलाम अब्दुल हमीद खान सध्या रा. कुरकुंभ, ता.दौंड,जि.पुणे मूळ रा.पिडवा पो.असणार तहसील-बासी,जि.सिद्धार्थनगर उत्तरप्रदेश 5) अर्जुन श्रीराम यादव सध्या रा.कुरकुंभ, ता.दौंड,जि.पुणे मूळ रा.माधवपुर ता.तुळशीपूर जि.बलरामपुर उत्तरप्रदेश यांना अटक करण्यात आले आहे. त्यांच्येकडून गुन्ह्यातील गेलेल्या मालापैकी 13,49,875/- रु.चा माल व गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेली वाहने महिंद्रा कंपनीची बलोरो मॅक्स एक्स पिकअप नंबर एम.एच.14 के.ए.9429 व पल्सर मोटार सायकल नंबर एम.एच.26 डि.ए.2185 अशी वाहने जप्त करण्यात आली आहेत.सदर गुन्ह्याचा तपास मा. संदीप सिंह गिल्ल,पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण,मा.गणेश बिरादार अप्पर पोलीस अधीक्षक,बारामती,मा.सुदर्शन राठोड उपविभागीय पोलीस अधिकारी,बारामती उपविभाग,सुपा पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक मनोजकुमार नवसरे, सहा.पोलीस निरीक्षक प्रकाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.सदर कारवाई मध्ये पोलीस निरीक्षक जिनेश कोळी,पोलीस हवालदार-संतोष पवार, महेंद्र गायकवाड,रुपेश साळुंखे,पोलीस अंमलदार किसन ताडगे,महादेव साळुंखे, भाऊसाहेब चौधरी,चालक सोमनाथ होले यांनी सहभाग घेऊन उत्कृष्ट तपास केला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस हवालदार संतोष पवार हे करीत आहेत.



### कोन्हाळे बुद्रुक मतदान केंद्राला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट

कोन्हाळे (दैनिक संध्या) : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कोन्हाळे बुद्रुक येथील मतदान केंद्रास भेट दिली.वयोवृद्ध,दिव्यांग मतदारांची उन्हापासून सुरक्षितता, अत्यावश्यक सेवा-सुविधांबद्दल व मतदान टक्केवारी वाढण्याबाबत बुथवरिल कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला.यावेळी सुनिल भगत,राजवर्धन शिंदे,प्रदिप बापु धापटे,रविंद्र खोमणे,बापुराव फणसे व कार्यकर्ते उपस्थित होते.

### जातेगाव खुर्द येथे 33/22 केव्ही विद्युत उपकेंद्रास मंजुरी; 11.11 कोटींची तरतूद

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील जातेगाव खुर्द परिसरासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत नवीन ३३/२२ केव्ही विद्युत उपकेंद्रास अखेर मंजुरी मिळाली आहे. या उपकेंद्रासाठी ११ कोटी ११ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, स्थानिक नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असल्याची माहिती राज्याचे माजी सहकार मंत्री तथा आमदार दिलीपराव वळसे पाटील यांनी दिली. या उपकेंद्रासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे माजी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या प्रयत्नांना यश आल्याची भावना व्यक्त होत आहे. या प्रकल्पामुळे जातेगाव खुर्दसह परिसरातील वीज वितरण व्यवस्थेत मोठी सुधारणा होणार आहे.

# विद्यार्थ्यांचे मातीशी नाते जोडण्यासाठी समितीचा पुढाकार

## समितीच्या संकुलात तंत्रज्ञानाधारित कृषी प्रकल्पाचे उद्घाटन; ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट आणि रोबोटिक्स यांच्याशी सामंजस्य करार

पुणे (दै. संध्या)




युवकांचे आपल्या गावाशी, तेथील मातीशी असलेले नाते कायम राहावे आणि मातीतून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने मोती पिकवता यावेत, या उद्देशाने विद्यार्थी सहायक समिती आणि ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती तसेच डिजिटेक रोबोटिक्स इंजिनिअरिंग, यांच्यामध्ये दोन विशेष सामंजस्य करार करण्यात आले. या करारान्वये कृषी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान, यांची सांगड घालून युवकांसाठी अधिकाधिक संधी निर्माण करण्याचा उद्देश असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

विद्यार्थी सहायक समितीच्या शिवाजी हौसिंग सोसायटी येथील लतिका गायतोंडे वसतिगृहाच्या संकुलातील २० गुंठे जागेवर कृषी प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. प्रसंगी समितीचे अध्यक्ष पद्मश्री प्रतापराव पवार हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बारामती कृषी विज्ञान केंद्राचे विशेषज्ञ संतोष करंजे, बारामती कृषी व संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य आशिष रासकर, बारामती कृषी महाविद्यालयाचे उद्यानविद्या विभागाचे प्रा. मच्छिंद्र आगळे, डिजिटेक रोबोटिक्सचे प्रमुख अजीत गटे, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, वीएसएस फाऊंडेशन अमेरिकाच्या अध्यक्ष अंजली अंतूरकर, समितीच्या विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे, समितीच्या स्टूडंट्स वेलफेअर असोसिएशनच्या संचालक सुप्रिया केळवकर आणि संचालक राजीव भागवत, प्रकल्प समन्वयक रत्नाकर मते, कृषी प्रकल्प समन्वयक सचिन खांडेकर, खजिनदार संजय अमृते, विश्वस्त तुकाराम गायकवाड, मनोज गायकवाड, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी कुलदीप देशपांडे आदी यावेळी उपस्थित होते.

ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे विशेषज्ञ संतोष करंजे यांनी तीन वर्षांच्या काळात ट्रस्टतर्फे ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांना समितीच्या प्रयोगशाळेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले. माती परीक्षणापासून ते थेट कृषी विपणनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा आणि छोट्या आकाराच्या जमिनीतूनही अधिक उत्पन्नस्रोत कसे मिळवायचे, याचे मार्गदर्शन केले जाईल. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा प्रसार करावा, आपल्या गावाकडील शेतीत तंत्रज्ञानाधारित मॉडेल उभारावीत, असे ते म्हणाले.

रोबोटिक्स सेंटरविषयी अजीत गटे व सुप्रिया केळवकर यांनी माहिती दिली. समितीच्या संकुलात या केंद्रासाठी साडेतीन हजार स्क्वेअर फूट जागेत पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. येथील प्रशिक्षण अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या त्रिस्तरीय ट्रेनिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिले जाईल. यशस्वी विद्यार्थ्यांना प्लेसमेंटची संधी मिळेल.

> "युवकांसाठी कृषी उद्योजकता आणि कौशल्य विकास प्रकल्प, हाच करारामागील उद्देश आहे. 'फार्म फॉर द फ्यूचर' हे ध्येय ठेवून उद्योजकीय मानसिकतेतून युवा सक्षमीकरणाकडे वाटचाल अपेक्षित आहे. उच्च शिक्षण घेताना विद्यार्थ्यांची शेतीची आवड कमी होते. मात्र, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने शिक्षण आणि शेती, यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न म्हणून या प्रकल्पाकडे बघता येईल. विषमुक्त शेतीबरोबरच तंत्रज्ञानाचा अधिक वापर करून उत्पन्नात वाढ करण्याचे कौशल्य आत्मसात करणे, हे या प्रकल्पातून शक्य होईल. यातून विद्यार्थी प्रगत शेतकरीच नव्हे तर उद्योजकतेच्या मार्गावरचा आधुनिक प्रवासी होईल."
>
> **- प्रतापराव पवार,** विद्यार्थी सहायक समितीचे अध्यक्ष

# आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील विकासकामांना गती

## दिलीप वळसे-पाटील यांची मुख्यमंत्र्यांशी भेट

कवठे येमाई (दै. संध्या)

आंबेगाव-शिरूर मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी माजी मंत्री तथा आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नुकतीच मुंबई येथे भेट घेतली. या भेटीत सिंचन,पाणीपुरवठा,वीज आणि आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक पायाभूत सुविधांबाबत सविस्तर चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी सर्व मुद्द्यांवर सकारात्मक प्रतिसाद देत लवकर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

कुकडी प्रकल्पातील महत्त्वाचे डिंभे धरण सुरक्षिततेचा प्रश्न या बैठकीत अग्रक्रमाने मांडण्यात आला. धरणातून होत असलेली गळती थांबवण्यासाठी १७१.५९ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार असून त्याला तातडीने प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी करण्यात आली. यामुळे धरणाचे आयुष्य वाढण्यास आणि भविष्यातील संभाव्य धोका टाळण्यास मदत होणार आहे.

आगामी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर परिसरात अखंडित वीज पुरवठ्यासाठी डिंभे येथे ३३/११ के.व्ही. उप केंद्र उभारण्याची गरज ही अधोरेखित करण्यात आली. यासाठी जलसंपदा विभागाची जमीन महावितरणकडे हस्तांतरित करून प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची विनंती करण्यात आली.

मंचर शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करता १३३.५१ कोटी रुपयांच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेलाही तातडीने मंजुरी देण्याचा मुद्दा मांडण्यात आला.या योजनेमुळे भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय होण्याची अपेक्षा आहे.धामणी परिसरातील शेतकऱ्यांनी लोकसहभागातून पूर्ण केलेल्या ९ उपसा सिंचन योजनांना अद्याप वीज जोडणी मिळालेली नाही. त्यामुळे सुमारे १२०० एकर क्षेत्र ओलिताखाली येण्यास अडथळा निर्माण झाला आहे. या योजनांना तातडीने वीज पुरवठा देण्याचे निर्देश देण्याची मागणी ही वळसे पाटील यांनी यावेळी केली.

तसेच कुकडी प्रकल्पांतर्गत कळमजाई, बोरघर आणि फुलवडे या तीन नवीन उपसा सिंचन योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत ही चर्चा झाली. या योजनांमुळे सुमारे १५८५ हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असून आदिवासी भागातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे."मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रश्न, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि भीमाशंकर तीर्थक्षेत्राचा विकास हे आमचे प्राधान्य आहे. मुख्यमंत्री महोदयांनी सर्व विषयांवर सकारात्मक भूमिका घेतली आहे," असे आमदार दिलीप वळसे-पाटील यांनी बोलताना सांगितले.

# जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांस संघनायक गौरव पुरस्काराने सन्मानित

कोरेगावमुळ (दै. संध्या)

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५ व्या जयंतीनिमित्त औचित्य साधून पुणे जिल्हा परिषदेचे नवनियुक्त अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांना संघ नायक न्यूज संपादक प्रा. सदाशिव कांबळे यांचे हस्ते 'संघ नायक गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी युवा नेते रोहित गजरमल, संघ नायक न्यूज दौंड तालुका प्रतिनिधी प्रथमेश गायकवाड, ऑल इंडिया पॅंथर सेना दौंड तालुका उपाध्यक्ष किरण जाधव, संघ नायक न्यूज पुणे जिल्हा समन्वयक आदिनाथ सरवदे, समाज सेवक मच्छिंद्र जाधव, दक्ष पोलीस टाइम्स दौंड निर्भिड पत्रकार विकास साळुंखे यांचेवतीने जगदाळे यांना सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पुणे जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे बोलताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीनिमित्त खास महिलांसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन केले. नियोजन व व्यवस्थापन छान केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समतेचा विचार घराघरात गेला पाहीजे. भारतीय संविधान हा आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. शिवराय ते भिमराय हा वारसा पुढे घेऊन जायला हवा. कार्यक्रमाला मला बोलावून माझा सन्मान केला त्याबद्दल आयोजकांचा मी आभारी आहे.

# बेल्हे येथील मॉडर्न स्कुलमध्ये बालआनंद मेळावा संपन्न

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील बेल्हे येथील मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये बालआनंद मेळावा प्राचार्य विद्या गाडगे, विश्वस्त दावला कणसे, उपप्राचार्य के.पी.सिंग, व विद्यार्थ्यांचे पालक यांच्या हस्ते संपन्न झाला. या मेळाव्यातून विद्यार्थ्यांनी ४० हजार रुपयांची उलाढाल केली.


मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रत्यक्ष कृतीतून व्यवहार ज्ञानाचे शिक्षण देण्यासाठी तसेच दररोजच्या जीवनात भाज्या कापणे, एखादा पदार्थ बनविणे, बाजारातून वस्तू आणणे त्याचा हिशोब ठेवणे, खरेदी विक्री करणे याचे प्रत्यक्ष शिक्षण देण्यासाठी आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, समोसा, भेळ, मिठाई,

छोले भटुरे, वडापाव, टरबूज, मंचुरीयन, दाबेली,सॅन्डविच, कैरी पन्हं, चायनीज भेळ, ज्यूस भेळ, मसाला पापड, इडली, फूड सॅलड, चना चॅट, मटकी चॅट असे खाद्यपदार्थ काही विद्यार्थ्यांनी घरून बनवून आणले होते.

# कागदपत्रांची हेराफेरी; वाटाणा आणि कलिंगडांच्या बियांची तस्करी

उरण (दै. संध्या)

जेएनपीए बंदरातून बनावट कागदपत्रांच्या आधारे तूरडाळ असल्याचे दाखवून वटाणा आणि कलिंगडाच्या बीयांची तस्करी करण्यात आलेल्या आयात दारावर मुंबई महसूल गुप्तचर संचालनालयाने कारवाई करीत १३९ कोटी रुपयाचा माल जप्त केला असल्याची माहिती मिळत आहे.



महसूल गुप्तचर संचालनालयाला नवी मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटी बंदरात शासनाकडून प्रतिबंधित असणाऱ्या पिवळा आणि हिरवा वटाणा बेकायदेशीर आयात होत असल्याची माहिती मिळाली या मिळालेल्या माहितीनुसार विरोधात मोठी कारवाई केली आहे.

या कारवाईत १३२ कंटेनरची तपासणी केली असता, त्यात २७१० मेट्रिक टन कलिंगडाच्या बिया तंजानिया आणि सुदानमधून आणि ३१९ मेट्रिक टन हिरवा वटाणा कॅनडातूनआल्याचे आढळून आले आहे. या जप्त केलेल्या मालाची साधारण पणे १३९ कोटी रुपये किंमत असल्याचे समजले आहे.

भारत सरकारने देशी शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी हिरवा आणि पिवळा वटाणाच्या आयातीवर निर्बंध घातले आहेत. हे केवळ कोलकाता बंदराद्वारे आणि ठराविक किमान आयात किमतीवर आयात केले जाऊ शकतात, मात्र यावर प्रतिबंध असताना ही जेएनपीए मार्गे आणले जात होते.ऑपरेशन डीप मॅनिफेस्ट द्वारे दुबई आणि इतर देशांतून पाकिस्तानी बनावटीच्या किंवा प्रतिबंधित वस्तूंची चुकीच्या नावाने होणारी आयात रोखण्यासाठी महसूल गुप्तचर संचालनालयाने ही विशेष मोहीम राबवली आहे.

यामध्ये ही मोठी कारवाई केली आहे या आगोदर ही २०२१ मध्ये जेएनपीए बंदरात बांबू बीन्स म्हणून चुकीची माहिती देऊन आणलेला २०० कोटींचा वटाणा जप्त केला होता. या अशा प्रकारच्या अनेक तस्करीच्या घटना घडत असल्याने जेएनपीए बंदर हे तस्करीचे माहेर घर असल्याचे सिद्ध होत आहे.

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची मान्सूनपूर्व आढावा बैठक

## एल-निनोच्या प्रभावामुळे पाणी पुरवठ्याबाबत नियोजन करा-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी; मान्सूनपुर्व कामांचे नियोजन करुन कामे वेळेत पुर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

पुणे (दै. संध्या)

एल-निनोच्या प्रभावामुळे यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे, ही बाब लक्षात घेता जलसंपदा विभागाने पाणी पुरवठ्याबाबत नियोजन करावे. मान्सूनपुर्व करावयाचे कामांचे सुक्ष्म नियोजन करुन ती सर्व कामे पावसाळ्यापूर्वी वेळेत पूर्ण करावीत, कामे करतांना सर्व सबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवावा. असे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित मान्सूनपूर्व तयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांनी दिले.



याबैठकीत जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकरी विठ्ठल बनोटे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, कृषी, आरोग्य, पुणे व पिंपरी चिंचवड महानगर पालिका, नगर परिषद, पुणे प पिंपरी चिंचवड शहर आयुक्तालय, जिल्हा अधीक्षक पुणे ग्रामीण कार्यालय, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महावितरण, प्रादेशिक परिवहन कार्यालय, जलसंपदा, एनडीआरएफ भारतीय हवामान विभागासह सर्व संबंधित विभागांचे उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार, मुख्याधिकारी (दूरदृष्यप्रणालीद्वारे) उपस्थित होते.

श्री. डुडी म्हणाले, यावर्षी १५ ऑगस्टपर्यंत पाणी पुरेल याद्दष्टीने जलसंपदा विभागाने नियाजन केले आहे.परंतु एल-निनोचा प्रभाव लक्षात घेता सन २०२७ मध्ये फेब्रुवारी ते मे या कालावधीत पाणी पुरेल याद्दष्टीने कार्यवाही करावी, गतवर्षी धरणातून पाण्याचा विसर्ग करण्याबाबत जलसंपदा विभागाने उत्तम नियोजन केले होते, त्याचद्दष्टीने यावर्षीही समन्वयाने कार्यवाही करावी. नदी, कालवा, नाला परिसरात अतिक्रमणे, राडारोडा काढण्याची कार्यवाही संबंधितांनी करावी. पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत सुरळीत राहतील , याद्दष्टीने कार्यवाही करावी. धरणाच्या सुरक्षिततेच्याद्दष्टीने आढावा, धरण बांधकाम, कालव्याची तपासणी करावी. गतवर्षी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा कार्यपालन अहवाल माहे एप्रिल अखेरचा जिल्हाधिकारी कार्यालयास कळवावा.

सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक तसेच अतिधोकादायक ठिकाणे, गावे, पुल, रस्ते, पूरबाधित गावांची पाहणी करुन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. गतवर्षी केलेल्या तपासणीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा कार्यपालन अहवाल माहे एप्रिलअखेर सादर करावा. पावसाळ्यात बंद रस्त्याला असलेले पर्यायी रस्त्याबाबत माहिती नागरिकांना द्यावी. आणीबाणीच्या वेळी उपयोगात येणारी बुलडोझर्स, वॉटरटँकर्स, डंपर्स, अर्थमुव्हर्स, डिवॉटरींग पंप्स, जनरेटर्स, ट्री कटर्स, फल्ड लाईट, आर.सी.सी.कटर्स, इत्यादी साहित्याची चालू स्थितीमध्ये असल्याबाबत याची खात्री करुन घ्यावी.

पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, नगरपरिषद नगरपंचायतीने आपल्या हद्दीतील धोकादायक इमारतीची बांधकाम तपासणी करावी. धोकादायक इमारतीमधील नागरिकांचे सुरक्षित स्थळी स्थालंतर करावे. जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी आपल्या हद्दीतील अनाधिकृत जाहिरात फलके महिन्याभरात काढून घ्यावीत.

पावसाळ्यात पर्यटनस्थळे बंद केली जाणार नाहीत, त्यामुळे पर्यटनस्थळी एकाच वेळी किती पर्यटकांना सोडता येईल, सुरक्षितेतच्याद्दष्टीने पोलीस, वन, पर्यटन, पुरात्व विभागाने पर्यटकांचे स्लॉट तयार करावेत. पर्यटनस्थळी आवश्यक ते प्रमाणे मनुष्यबळ नियुक्त करावे.

आरोग्य विभागाने संभाव्य आपत्कालिन परिस्थितीचा विचार करुन नागरिकांना तात्काळ सेवा मिळेल, याबाबत नियोजन करावे. तालुकानिहाय रुग्णालय, खाटा, वैद्यकीय अधिकारी, रुग्णवाहिका, रक्तपेढी, औषधे साठा तयार ठेवावे. साथीचे रोग व उपचारपद्धती आदीबाबत प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, याबाबत नागरिकांना माहिती द्यावी.

संबंधित विभागाने जिल्हास्तरापासून ते गावपातळीपर्यत आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करुन घ्यावा. याबाबत नागरिकांना माहिती द्यावी. आजच्या बैठकीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकाऱ्यांनी तालुकानिहाय आपत्ती व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेवून संबंधिताना सूचना द्याव्यात. मान्सून काळात पूरबाधित गावाच्या अनुषंगाने आपत्कालीन यंत्रणा सर्व विभागांच्या समन्वयाने सज्ज ठेवावी. नागरिकांची गैरसोय टाळण्याकरिता आपत्तीच्या काळात आवश्यक त्या सर्व सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात यावे. भोर, खेड, आंबेगाव उपविभागात भुस्खलनाच्या पार्श्वभुमीवर नागरिकांचे स्थलांतर, आपदा मित्राचे प्रशिक्षण, सुसज्ज साहित्य तसेच मॉकड्रीलचे आयोजनाबाबत कार्यवाही करावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांची गैरसोय टाळण्याच्याद्दष्टीने त्यांना आवश्यक त्या सर्व सोई-सुविधा मिळतील याद्दष्टीने नियोजन करावे

यावेळी सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मान्सून पूर्व तयारीच्या अनुषंगाने करीत असलेल्या तयारीबाबत माहिती दिली.